

मासिक वार्तापत्र • अंक 21 • जुलै 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

अफगाणिस्तानातून अमेरिकेची माघार, तालिबानची वाढती पकड 7

भांडवलदारांच्या हितांकरिता लक्षद्वीप बेटांवर भाजपचे जातीय राजकारण! 8

चंद्रशेखर आझादांची शहादत सतत प्रेरणा देत राहील! 15

## बेरोजगारीचे संकट हे भांडवली व्यवस्थेचे संकट आहे!

### स्पर्धा परिक्षांच्या आणि नवनवीन आरक्षणाच्या मृगजळामागे न धावता,

### अस्मितावादी राजकारण नाकारत, रोजगार अधिकाराचे आंदोलन उभे करा!

मराठा आरक्षणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, एम.पी.एस.सी.ची रखडलेली भरती व विद्यार्थी आत्महत्या, आणि लॉकडाऊन नंतर दिसणारी रोजगाराची भयंकर परिस्थिती या सर्वांच्या संदर्भात बेरोजगारीच्या प्रश्नाला मूळातून हात घालणे महत्त्वाचे आहे. बेरोजगारीसाठी स्वत:ला दोषी न मानता, भांडवली व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत; अस्मितावादी राजकारणामागे जाऊन अस्तित्वातच नसलेल्या भाकरीच्या तुकड्यासाठी आंदोलन न करता, प्रत्येक व्यक्तीला काम मिळेल अशा रोजगाराच्या अधिकाराकरिता आंदोलन उभे करणे हाच या सर्व प्रश्नांवर खरा उपाय आहे.

#### एम.पी.एस.सी. विद्यार्थ्यांचे आंदोलन

स्वप्नील लोणकर या राज्यसेवा (एम.पी.एस.सी.) परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याच्या आत्महत्येमुळे महाराष्ट्रात एम.पी. एस.सी. परिक्षांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. यानंतर राज्यात ठिकठिकाणी परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची आंदोलनेही झाली. 2019 मध्ये झालेल्या परिक्षेत 419 जागा भरल्या गेल्या होत्या, यापैकी अनेक जागांवरील नियुक्त्या अजूनही केल्या गेल्या नाहीत.

आंदोलनानंतर महाराष्ट्र सरकारने जाहीर केले आहे की 15,511 जागांवर 31 जुलै पर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. यानंतर झालेल्या कारवाईतुन अशी प्रक्रिया जुलै अखेरीस पूर्ण होण्याची कोणतीही

**संपादक मंडळ**

चिन्हे दिसत नाहीत. एकूण 817 उमेदवार ज्यांची एम.पी.एस.सी. ने शिफारस केलेली आहे त्यांना नियुक्त्या दिल्या जातील आणि 837 उमेदवार जे प्राथमिक परिक्षा उत्तीर्ण आहेत, त्यांची मुख्य परिक्षा घेतली जाईल अशीही आश्वासने दिली गेली आहेत, परंतु त्यावरही अजून कारवाई नाही.

वास्तवात पाहिले तर यु.पी. एस.सी. चा अर्ज भरणाऱ्यांची संख्या 17 लाखांवर गेली आहे, आणि जागा आहेत फक्त 800–1,000. एम.पी.एस.सी. चा अर्ज भरणाऱ्यांची संख्या 2 ते 3 लाखांवर गेली आहे आणि जागा निघतात फक्त 200–300. थोडक्यात लाखोंच्या संख्येने परिक्षार्थी आणि जागा फक्त काही शे! तेव्हा महाराष्ट्र शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे सर्व जागा जरी भरल्या, तरी लाखो विद्यार्थी बेरोजगारच राहणार आहेत. नेहमीच्या पद्धतीने काही शे जागा भरल्या गेल्या तर स्थिती अजूनच बिकट राहणार आहे.

गेल्या तीस वर्षांमध्ये सरकारी सेवांचे प्रचंड खाजगीकरण, कंत्राटीकरण घडवले गेले आहे, त्या परिणामी जागा नाहीतच ही खरी समस्या आहे. आता तर यु.पी.एस.सी. न करता 'लॅटरल एंट्री' द्वारे सुद्धा केंद्र सरकार अधिकारी भरती करत आहे. स्पर्धा परिक्षांमागे इतक्या मोठ्या प्रमाणात युवकांनी जाण्याचे कारणच हे आहे की सुरक्षितता देणारा रोजगार इतरत्र शिल्लकच नाही. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या आणि आयुष्याची मौल्यवान वर्षे अभ्यासात घालवत खोटी आशा लावून धरणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना आज हे समजणे आवश्यक आहे की रोजगाराच्या अधिकाराच्या मागणीशिवाय स्पर्धा परिक्षांकडून आशा लावणे म्हणजे मृगजळाची आस आहे.

पान 4 वर

## दिल्लीतील 2020 मधील धार्मिक हिंसेचा खटला आणि यू.ए.पी.ए. कायद्याचा गैरवापर

✎ **बबन**

दिल्लीमध्ये 2020 मध्ये सी.ए.ए., एन.आर.सी. विरोधात चालेलल्या आंदोलनावेळी, हिंदुत्ववाद्यांकडून करवण्यात आलेल्या हिंसेसंदर्भात अनेक खोटे खटले दिल्ली पोलिसांनी भरले आहेत. दोन वर्षांनंतर यासंदर्भात चालू असलेल्या खटल्यांमधल्या घडामोडींनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की फॅसिस्ट मोदी सरकार कशाप्रकारे जनतेच्या नागरी आणि लोकशाही अधिकारांना चिरडण्यासाठी हुकूमशाही पद्धतीने काम करत आहे.

याच संदर्भात अटकेत असलेले तीन विद्यार्थी कार्यकर्ते नताशा नरवाल, देवांगना कलिता, आणि आसिफ तन्हा यांना जामीन देतांना यु.ए.पी.ए. या कायद्याच्या दुरुपयोगाबद्दल चिंता व्यक्त करतांना न्यायालयाने सरकारांना सुनावले आहे की, "कोणावरही दहशतवादी असल्याचा गंभीर गुन्हा ठेवण्याच्या अगोदर गांभीर्याने विचार करण्यात यावा!" पुढे अजून स्पष्ट करतांना न्यायालयाने म्हटले आहे की "आम्हाला हे बोलायला प्रवृत्त केले जात आहे कि, सरकार असहमतीचा सूर दाबण्यासाठी प्रचंड उतावीळ झाले आहे. विरोध करण्याचा अधिकार आणि 'दहशतवादी कारवाई' यामधील रेषा अंधुक होत चालली आहे. जर अशाच धारणा बळकट होत गेल्या तर लोकशाहीसाठी ते दु:खद असेल." न्यायालयाच्या या टिपण्णीवर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दीपक गुप्ता यांचे म्हणणे आहे कि, "दिल्ली न्यायालयाच्या या निर्णयात सर्वात चांगली बाब हि आहे की, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे नागरिकांचा अधिकार आहे; त्याला हिरावून घेतले जाऊ शकत नाही."

या तिघांवरचा खटला आणि त्यासंदर्भातील घडामोडी जाणून घेऊयात.

#### एफ.आय.आर. क्रमांक 59: नताशा, देवांगना आणि आसिफ वरील दहशतवादाच्या आरोपाला न्यायालयाने फेटाळले

एफ.आय.आर. क्रमांक 59 चा उल्लेख यासाठी महत्वाचा आहे की, या अंतर्गत 22 जणांवर यु.ए.पी.ए. (UAPA) या कायद्याखाली दहशतवादी कृत्याची नोंद इतर गुन्ह्यांसह करण्यात आली आहे. यु.ए.पी.ए. या कायद्याची निर्मिती दहशतवादासंबंधी संशयित आरोपींना जामीन न देता तुरुंगात ठेवण्याकरिता केला गेला आहे, असा सरकारचा दावा आहे. वास्तवात मात्र या, आणि पूर्वीच्या टाडा, पोटा सारख्या अशाच कायद्यांचा वापर जनतेकरिता लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या दमनाकरिताच केला गेल्याचे दिसून येते. दिल्ली पोलिसांच्या क्राईम ब्रांचच्या म्हणण्यानुसार "दिल्ली हिंसेमागे नियोजित षडयंत्र होते." यासाठी पिंजरा तोड, जामिया कॉर्डिनेशन कमिटी, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, युनायटेड अगेन्स्ट हेट या संघटनांच्या कार्यकर्त्यांना

पान 6 वर

# दिल्लीजवळील 2.5 लाख लोकसंख्येचे खोरी गाव उध्वस्तीकरणाकडे!

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने लाखो होणार बेघर!

निश्चय

पोलिस आणि सैन्यदलाच्या उपस्थितीत जवळपास 2.5 लाख लोक रहात असलेल्या दिल्ली-हरियाणा सीमेजवळील लाल कुआँ भागातील खोरी गावातील 48,000 घरांना, अरवली जंगलाच्या जागेत वसलेले हे संपूर्ण गावच बेकायदेशीर असल्याचे सांगत, जुलैच्या सुरूवातीपासून उध्वस्त केले जात आहे. करोना महामारीमध्ये केली जाणारी ही फक्त हरियाणा सरकारची आणि फरिदाबाद महानगरपालिकेची कारवाई नाहीये तर या कारवाईमागे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा (खानविलकर आणि माहेश्वरी यांचे खंडपीठ) आदेश सुद्धा आहे! **पुनर्वसनाच्या कोणत्याही तयारीविना ही उध्वस्तीकरणाची कारवाई केली जात आहे. हजारो लोकांच्या विरोधाला बळपूर्वक मोडून काढत, आंदोलकांच्या नेत्यांना अटक करत ही कारवाई केली जात आहे. अटक झालेल्यांपैकी बिगुल मजदूर दस्ताचे कार्यकर्ते सार्थक, डी.एस.यु. संघटनेचे प्रभाकर, आय.एम.के. चे नितेश यांना पोलिस कोठडीमध्ये प्रचंड अमानुष मारहाण केली गेली.**

या वस्तीमध्ये अंदाजे जवळपास 5 हजार गर्भवती आणि नुकत्याच बाळंत महिला आहेत तर 20,000 लहान मुलं राहतात. गावामध्ये पक्की सडक, 5 शाळा आणि काही पक्की घरे सुद्धा आहेत. सरकारी आकडा 1 लाख लोकसंख्येचा आहे, परंतु संयुक्त राष्ट्रांच्या एका अधिकाऱ्याच्या मते आकडा 2.5 लाख लोकसंख्येचा आहे. 1970पासून खाणींमध्ये कामाकरिता आलेल्या उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, झारखंड इत्यादी राज्यातील कामगारांनी या गावाला वसवले. स्वत:च्या हातांनी मेहनत करून कामगारांनी जमिन सपाट केली, खड्डे बुजवले, आणि घरे बनवली. तेव्हा राज्यसत्तेला या कामगारांची गरज होती म्हणून त्यांना झोपड्या बांधू दिल्या गेल्या. इतकी वर्षे इथेच राहणाऱ्या या लोकांकडे स्थानिक आधार कार्ड, मतदार कार्ड सुद्धा आहे आणि स्थानिक निवडणुकांमध्ये त्यांनी मतदानही केले आहे. अनेक घरांमध्ये सरकारी पाणी आणि वीजही पुरवली जात होती. या कारवाईविरोधात जागतिक संघटना असलेल्य संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधीने सुद्धा इशारा दिला आहे की हे मानवी हक्कांचे उल्लंघन आहे, परंतु देशच हुकूमशाही पद्धतीने चालवला जात असताना, बिनादाताच्या संयुक्त राष्ट्रांच्या वाघाला कोण विचारतं?

या गावाची जमीन वनखात्याची आहे असे सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे. येथे राहणाऱ्या लाखो लोक विचारत आहेत की: अनेक दशके आम्ही इथे राहून कष्ट करून देशाच्या निर्मितीमध्ये योगदान देत होतो, आयुष्यभराची कमाई खर्च करून जेव्हा आम्ही लहानश्या का होईना झोपड्या बांधल्या आहेत, आमची गरज होती तेव्हा तर सरकार गप्प बसले होते, तेव्हा आज आम्ही बेकायदेशीर कसे? वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी आमच्याकडून लाच खाऊन जेव्हा आम्हाला घरे बांधू दिली तेव्हा वनखाते कुठे होते? ज्या न्यायाधीशांनी आमचे घर तोडण्याचा आदेश दिला, त्यांना मुलंबाळं नाहीत का? मोदी म्हणाले "गरिबी हटावो", त्याचा अर्थ होता "गरीब ही हटाओ"! आजूबाजूला जे धनिक शेतकरी आणि हॉटेलवाले आहेत, ते सुद्धा वनखात्याच्या जमिनीवरच आहेत, मग फक्त गरिबांच्याच झोपड्या का हटवल्या जात आहेत?

ओखला आणि फरिदाबाद या दोन औद्योगिक वसाहतींच्या मध्ये येणाऱ्या या भागाचे भांडवलदारांना औद्योगिक विस्तारासाठी आकर्षण आहे. दिल्लीमधील मॅन्युफॅक्चरींग युनिट शहराबाहेर नेण्याची चर्चा चालू आहे, आणि या भागाचे महत्त्व त्यामुळेही वाढते. हे लक्षात घेतले पाहिजे की वनखात्याची जागा हा मुख्य मुद्दाच नाही. अन्यथा उत्तराखंडातील जंगले रिलायन्सला आणि सुंदरवनातील मॅनग्रोव इतर भांडवलदारांना आंदण दिले गेले नसते. भांडवलदारांचे हित जपण्यासाठी आत सरकार आणि सर्वोच्च न्यायालय मिळून गरिबांना हाकलण्याचे काम करत आहेत.

या झोपडपट्टीतच राहणाऱ्या एका पोलिस हवालदाराला जेव्हा कारवाईबद्दल विचारले गेले तेव्हा तो म्हणाला की "आदेश आहे म्हणून हे माझेच साथीदार माझीच झोपडी पाडत आहेत. मला आदेश असता, तर मला सुद्धा हेच करावे लागले असते." यावरून आपण कामगार-कष्टकऱ्यांनी हे समजले पाहिजे की या देशातील कायदा, पोलिस यंत्रणा, न्याय व्यवस्था हे फक्त भांडवलदारांसाठी आहेत, आपल्यासाठी नाहीतच! सरकारला वाटते की दमन करून ते जनतेच्या आंदोलनाला चिरडू शकतात, परंतु इतिहास साक्षी आहे की दमन केल्याने कोणतेही आंदोलन कधी संपलेले नाही, तर त्याने नेहमीच व्यापक जनतेला लढण्यासाठी अधिक कटीबद्ध केले आहे!

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर - 9156323976, 9657590491
- पुणे - 9422308125

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |

# पुण्यात 133, दांडेकर पूल येथे झोपडपट्टी तोडण्याची कारवाई

## सर्व भांडवली पक्षांचे बिल्डरधार्जिणे चारित्र्य ओळखा!

## आवासाच्या अधिकारासाठी संघटीत व्हा!

राहुल

पुण्यामध्ये 133, दांडेकर पूल, या वसाहतीमध्ये दिनांक 24 जून रोजी पोलिसी बळाचा वापर करत बुलडोझर चालवला गेला. काही घरे तोडल्यानंतर कोर्टाच्या स्थगिती आदेशामुळे कारवाई थांबलेली असली, तरी झोपडपट्टी पुन्हा पाडली जाण्याची शक्यता कायम आहे. दिल्लीजवळ खोरी गावामध्ये तर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानेच एक खूप मोठी वसाहत अशाचप्रकारे तोडली जात आहे. गरिबांच्या झोपड्या तोडण्याच्या कारवाया देशाला नव्या नाहीत. सध्याच्या घटनांवरून तरी आज सर्व कामगार-कष्टकऱ्यांनी हे समजणे आवश्यक आहे की काल ते जात्यात होते, तर बाकीचे सुपात आहेत! या कारवायांमधून सत्तेत असलेल्या सर्व पक्षांचे बिल्डर-भांडवलदार धार्जिणे चारित्य तर समोर येतच आहे, सोबतच आपल्या घरांना वाचण्यासाठी आणि आवासाच्या अधिकारासाठी एकजूट होण्याची आवश्यकताही अधोरेखित होत आहे.

### 133, दांडेकर पूल, पुणे येथे झालेली कारवाई

दिनांक 24 जून रोजी भल्या पहाटे मनपा प्रशासन बुलडोझर घेऊन पोलिसांच्या ताफ्यासोबत वस्तीमध्ये दाखल झाले आणि कारवाई सुरू झाली. घरं तोडण्याबद्दल मनपाच्या आदेशाची मागणी केली असता कुठलाही लेखी आदेश दाखवण्यात आला नाही. मनपा प्रशासन व पोलिस अधिकाऱ्यांना मुबंई उच्च न्यायालयाच्या कोरोना काळात 9 जुलै पर्यंत कुठल्याही विस्थापनाच्या कार्यवाहीस असणाऱ्या स्थगितीचा आदेश दाखवण्यात आला व ही कार्यवाही उच्च न्यायालयाचा अवमान आहे हे निदर्शनास आणून देण्यात आले. तरीही घरं जमीनदोस्त केली गेली. नागरिकांनी हिटलरी कारवाईला एकतेच्या बळावर जबरदस्त विरोध सुरू केला. पण पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या जनतेतील कार्यकर्त्यांना लगेच उचलून स्थानबद्ध केले. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत तसेच महिलांवर सुद्धा जोर-जबरदस्ती व जुलूम करण्यात आला. अशा पद्धतीने बळाचा वापर करण्यासंबंधी निर्णय महानगरपालिका आयुक्तांचा व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा होता आणि सर्व पोलिसदल व सरकारी अधिकारी-कर्मचारी त्याची अंमलबजावणी करत होते. ही कारवाई बिल्डरच्या हिताकरिता करण्यात आली. हे स्पष्ट आहे की पोलिस व अधिकारी हे जनतेचे सेवक नसून भांडवली सत्तेच्या हुकूमाचे गुलाम असतात.

ह्या प्रकरणात 23 जून रोजी बिल्डरकडून परस्पर स्थानिक नागरिकांना एक नोटीस देण्यात आली. परंतु मनपाची कुठलीही नोटीस आलेली नसल्यामुळे स्थानिक नागरिकांनी बिल्डरची नोटीस स्वीकारली नाही. ह्यासंबंधी पोलिसांत तक्रार केली असता ती नोंदवून घेण्यास पोलिसांनी नकार दिला. ताबा सोडण्याबद्दल मनपाची कुठलीही तकालिन नोटीस लोकांना मिळलेली नव्हती. निश्चितपणे घरे तोडण्याचा **आदेश पुणे मनपा आयुक्तांनीच दिलेला होता.** पुणे महानगरपालिकेत भाजपची सत्ता आहे आणि राज्य सरकार शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे आहे. या सर्वांच्या माहितीशिवाय असा आदेश निघालेला असणे शक्य नाही.




### पार्श्वभूमी आणि सत्य

133, दांडेकर पूल ही पुण्यातील आंबिलओढा या ओढ्याभोवती असलेल्या अनेक वस्त्यांपैकी एक आहे. या वसाहतीच्याच भोवती असलेल्या अनेक वस्त्या मिळून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झोपुपा, किंवा एस.आर.ए.) च्या योजनेअंतर्गत येथे गृहनिर्माण प्रकल्प करण्याचे नियोजन अनेक वर्षे चालू आहे. केदार असोसिएट्स या बिल्डरमार्फत अनेक लोकांची याकरिता सहमती घेतली गेली आहे. या सर्व प्रक्रियेदरम्यान प्रचंड गोपनियता नेहमीप्रमाणेच पाळली गेली आणि जनतेला अंधारात ठेवले गेले.

आंबिल ओढ्यातील एस.आर.ए.प्रकल्पासंबंधात योजनेला जनतेचा कधीच विरोध नव्हता. सुरक्षित व चांगली घरं कोणाला नको आहेत? परंतु, निवाऱ्या सारख्या अत्यंत मूलभूत अधिकाराबद्दल असलेली योजना आणि तिची प्रक्रिया याबद्दल कोणतीही स्पष्ट लेखी माहितीच दिली गेली नाही! नालापात्र बदलण्याचा घाट मनपाने का घातला आहे, अंतिम पात्र-अपात्रांची यादी, नाला मार्ग बदलामुळे बाधितांची यादी, एस.आर.ए. इमारत कुठे बनणार; सर्व नागरिकांना आहे त्याच जागी सदनिका मिळणार आहेत की नाही, पुनर्वसनाची प्रक्रिया कुठल्या टप्प्यापर्यंत पोहोचली आहे, केदार असोसिएट्स ह्या बिल्डरच्या रखडलेल्या एस.आर.ए. प्रकल्पांची यादी, त्याचा कालावधी व कारणे अशा अत्यंत मूलभूत माहितीसाठी बिल्डर, एस.आर.ए. आणि मनपा ह्यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करूनसुद्धा नागरिकांना माहिती मिळाली नाही. स्थानिक नागरिकांना आपली सोसायटी बनवायची आहे तसेच सर्व लेखी माहिती व जागेवर सदनिका मिळतील ह्याची लेखी हमी हवी आहे. माहिती मिळत नाही तोपर्यंत ताबा सोडण्यास नागरिक तयार नाहीत. नागरिकांची ही अपेक्षा अशी कुठली मोठी अपेक्षा आहे? कोणतीही खात्रीपूर्वक लेखी माहिती ना कधी बिल्डरतर्फे दिली गेली, ना झोपुपा कार्यालयातर्फे. राष्ट्रवादी, शिवसेनेच्या नेत्यांसोबत झालेल्या मिटींगांमध्ये झोपुपा आणि बिल्डरने माहिती देण्याचे आश्वासन दिले, परंतु ते कधीही पाळले गेले नाही. हे स्पष्ट आहे की या मिटींगा म्हणजे नुसता फार्स होता.

### आवासाचा (घरकुलांचा) अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार

देशात आवासाच्या मूलभूत अधिकाराची अवस्था ही आहे की 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील **शहरी भागात 6.5 कोटी लोकं झोपडपट्टीतील असुरक्षित व मानवी आरोग्य व प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून अत्यंत निकृष्ट घरांमध्ये रहात आहेत.** तसेच ग्रामीण भागातून कामाच्या शोधात शहरात येणाऱ्या कामगारांचा सतत वाढता ओघ ह्यात दिवसागणिक भर घालतो आहे. स्वातंत्र्य मिळून 74 वर्ष झालेली आहेत परंतु आवासासारखा अत्यंत मूलभूत अधिकारही जनतेला अजूनही मिळू शकलेला नाही. देशातील सर्व घरे तर आम्हीच कामगार-कष्टकऱ्यांनी बांधली, मग आज आम्हीच घरांवाचून कसे? साडेसात दशकांचे स्वातंत्र्य कोणाचे? कोणाचे महाल आणि बंगले उभे राहिले आणि कोण दारिद्र्यात जगणे जगत राहिला? याकरिता हे समजणे आवश्यक आहे की देशातील सर्व व्यवस्था ही फक्त भांडवलदारांच्या नफ्यासाठी चालवली जात आहे!

आज आपण भांडवली व्यवस्थेत जगतो आहोत म्हणजेच अशी व्यवस्था जी कामगार-कष्टकऱ्यांच्या शोषणातून मालकवर्गाच्या नफ्यासाठी चालते. आज काही लोकशाही, नागरी अधिकार देणारे तुटपुंजे कायदे सोडले तर बहुतांश कायदे, नियम भांडवलाची-मालक वर्गाची सेवा करण्यासाठीच अस्तित्वात आहेत; मालक वर्गाच्या म्हणजेच बिल्डर, कारखानेदार, शेतमालक, व्यापारी, ठेकेदार, दलाल, सावकार ह्यांच्या बाजूचेच आहेत. उदाहरणार्थ **एस.आर.ए. (SRA) सारखा कायदा सुद्धा 'पात्र' झोपडपट्टी धारकांना घर देण्याच्या नावाखाली आडवी झोपडपट्टी उभी करून बिल्डरांच्या घशात मोक्याच्या जमिनी घालण्यासाठीच बनवण्यात आला आहे.** एस. एस. तिनाईकर समितीने 2001 मध्ये एस.आर.ए. बद्दल जो अहवाल दिला होता त्यात नमूद केले होते की एस. आर. ए. **कायदा हा "बिल्डरांचा, बिल्डरांकडून, बिल्डरांसाठी"** आहे. कायदे भांडवलाची सेवा करतात तेव्हा 'कायदा व सुव्यवस्था' टिकवण्याच्या नावाखाली पोलीस बळाचा वापर करतात ते खाजगी मालकी व भांडवलाच्या रक्षणाचे आणि कामगार-कष्टकऱ्यांचे दमन करण्याचे व शोषणकारी व्यवस्थेच्या संरक्षणाचेच काम करतात. त्यामुळे ही मालकशाही आहे, आणि लोकशाही ही सर्व कामगार-कष्टकरी जनतेची लोकशाही नसून भांडवली लोकशाही आहे.

### सर्वपक्षीय संगनमत

घरे पाडण्याचा आदेश कोणी दिला याबद्दल भांडवली प्रसारमाध्यमांनी सुद्धा गोंधळाचे वातावरण तयार केले. हा आदेश पुणे महानगरपालिका आयुक्तांनीच दिला होता. आयुक्तांची नेमणूक राज्य सरकारने केलेली असते आणि ते राज्य सरकार व महानगरपालिकेलाही उत्तरदायी असतात. तेव्हा घरे पाडण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतलेला होता आणि तो निश्चितपणे **राज्य सरकार (शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे सरकार) आणि महानगरपालिका (भाजप सरकार) यांच्या माहितीतच घेतला होता.** आज ह्याच सर्व भांडवली पक्षांचे कार्यकर्ते वस्तीमध्ये येऊन कष्टकऱ्यांना सहानुभूती दाखवण्याचे ढोंग करत आहेत. या पक्षांचे स्थानिक कार्यकर्ते जनतेसाठी अधूनमधून धडपड करण्याचा दिखावा करतात, परंतु ह्यांच्याच सरकार मधील वरिष्ठ नेते बिल्डर धार्जिणे निर्णय घेतात हे स्पष्ट आहे.

### आम्हीच निर्माण केले, आम्हालाच अधिकार नाही!

एस.आर.ए योजनेमध्ये अनेकांना कागदपत्रे असुनही अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे अपात्र घोषित करून आवासाचा मूलभूत अधिकार नाकारण्यात येतो. प्रवासी कामगारांच्या (इतर भागातून विस्थापित होऊन कामाच्या शोधात प्रवास करून शहरात आलेल्या) आवासाचा तर ह्यात विचारही होत नाही. तसेच वेळोवेळी पावसाच्या संभाव्य धोक्याचा इशारा देताना अनेक वस्त्यांमधील कामगार-कष्टकऱ्यांना अनधिकृत रित्या वास्तव्यास राहतात अशा नोटीसा दिल्या जातात. कामगार-कष्टकरी असुरक्षित-दाट-गलिच्छ वस्त्यांममध्ये मरणाची हौस पूर्ण करण्यासाठी वास्तव्य करतात असे भांडवली शासन-प्रशासनाला वाटते की काय? **सर्व घरे, मॉल, बिल्डिंगा बांधणारे आम्हीच अनधिकृत कसे?** अशा नोटीसा हे सांगत असतात की तुम्ही देशाचे समान नागरीक नाही!

कामगार-कष्टकऱ्यांनी ह्या अवाढव्य शहरांना आपल्या हातांनी आकार दिला, रक्तानी शिंपले. जमीन खोदण्यापासून इमारती उभ्या करण्यापर्यंत, सुई पासून विमानापर्यंत, काडीपेटी पासून अवाढव्य मॉल पर्यंत सर्व काही कामगार-कष्टकरीच आपले रक्त आटवून बनवतो; पण कामानंतर शहरातल्या अत्यंत गलिच्छ ठिकाणी फेकल्या जातो कारण शहरातल्या सुरक्षित जागा, पक्की घरं धनवानांची

पान 6 वर

# अस्मितावादी राजकारण नाकारत, रोजगार अधिकाराचे आंदोलन उभे करा!

पान 1 वरुन

## मराठा आरक्षणाच्या निमित्ताने: बेरोजगारी हाच खरा प्रश्न, जातींमधील वर्गीय अंतर्विरोध ओळखा!

नुकताच सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात मराठ्यांना आरक्षण देण्याचा प्रस्ताव निकाली काढला. लाखो लोकांचे 'मूक मोर्चे' काढून मराठा आरक्षणाकरिता दबाव निर्माण केला गेला होता आणि मराठा मतांच्या संख्येकडे बघता लोकरंजकतेचे राजकारण करणाऱ्या सर्वच पक्षांचा मराठा आरक्षणाला पाठिंबा नसता तरच नवल. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महाराष्ट्रात मराठ्यांकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गांतर्गत शिक्षणात 12 टक्के आणि नोकऱ्यांमध्ये 13 टक्के असे आरक्षण लागू केले गेले होते, परंतू सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश रद्द करत सदर आरक्षण हे घटनाबाह्य असल्याचे नमूद केले आहे.

या निकालाच्या निमित्ताने मराठा जातसमुह हा मागासलेला आहे का, एस.बी.ई.सी.ची व्याख्या काय, ही यादी ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारचा की राज्य सरकारचा, मराठा-कुणबी एक की वेगळे, इतर कोणत्या मार्गाने आरक्षण देता येईल का, 50 टक्के आरक्षणाची मर्यादा कशी ओलांडता येईल, संसदेत कायदा/घटनादुरुस्ती केली जावी का, इत्यादी प्रश्न उपस्थित होत आहेत. खरेतर **हे सर्वच प्रश्न मूळ प्रश्नाला बगल देत, चर्चेला अस्मितेच्या राजकारणाच्या एका चौकटीत बांधणारे प्रश्न आहेत**, आणि त्या अर्थाने बेरोजगारीचा मूळ प्रश्न व भांडवली व्यवस्थेला चर्चेबाहेर ठेवणारे आहेत.

महाराष्ट्रामध्ये फक्त मराठेच नाहीत तर धनगर, मुस्लिम, इत्यादी जातीय उतरंडीतील 'मधले' जातसमुह सुद्धा आरक्षण मागत आहेत. देशाच्या स्तरावर पाहिले तर लौकिकार्थाने भूस्वामी असलेल्या जातसमुहांपैकी मराठा, हरियाणातील जाट, गुजरातमध्ये पाटीदार, राजस्थानामध्ये गुज्जर, आंध्रामध्ये कापू हे जातसमूह सुद्धा आरक्षण मागताना दिसत आहेत. पूर्वी स्वत:ला क्षत्रिय सिद्ध करण्यासाठी लढणाऱ्या या जाती भांडवली उत्पादन व्यवस्थेमध्ये आता स्वत:ला मागास सिद्ध करू पहात आहेत. परंपरेने सत्ता आणि उत्पादन साधनांपासून वंचित असलेल्या एस.सी., एस.टी. समुहांना राज्यघटनेने आरक्षण प्राप्त करून दिले. परंतु परंपरेने राज्यसत्तेचा भाग असलेल्या जातसमुहांकडून होत असलेल्या आरक्षणाच्या मागणीला, त्या मागणीमधील अंतर्विरोधांना भांडवली उत्पादन व्यवस्थेच्या चौकटीतच समजून घेतले जाऊ शकते, फक्त जातीय चौकटीत नाही.

हे समजणे आवश्यक आहे की मराठा असो वा इतर कोणताही जातसमूह, आज **कोणत्याही जातीमधील सर्वांचे वर्गहित एक नाही!** प्रत्येक जातीमध्ये एक भांडवलदार वर्ग, मध्यम/उच्च-मध्यम सुविधाभोगी स्तर निर्माण झालेला आहे. सत्ताधारी वर्गाचा भाग असलेल्या या वर्गाचे आणि त्याच जातीतील कामगार-कष्टकरींचे हित आज एक नाही. याला आपण मराठा जातसमुहाच्या आकडेवारीवरून समजून घेऊयात. मराठा जातसमुहापैकी 77 टक्के लोक आजही शेतीमध्ये गुंतलेले आहेत. शेतीमध्ये खुंटलेला विकास सर्वज्ञात आहे. ग्रामीण भागांमध्ये दरडोई उत्पन्न शहरी भागाच्या तुलनेने 3 पटींपर्यंत कमी सापडते. गेली तीन दशके शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न धुमसत आहे, आणि 2017 पर्यंत आत्महत्या करणाऱ्यांमध्ये 65.8 टक्के शेतकरी हे मराठा जातसमुहातील होते (10.4 टक्के धनगर, 54 टक्के लिंगायत, 3.1 टक्के माळी होते.) शेतीमध्ये सर्वाधिक वेगाने ज्यांचे कामगारीकरण (proletarianisation) झाले आहे, त्यात मराठा जातसमुदाय येतो. 65 टक्के मराठा जातसमुह गरीब आहे आणि फक्त 4 टक्के मराठ्यांकडे 20 एकर पेक्षा मोठ्या जमिनी आहेत. 37 टक्के मराठा जातसमुह दारिद्र्यरेषेखाली जगत आहे आणि 93 टक्के परिवारांचे वार्षिक उत्पन्न 1 लाखांपेक्षा कमी आहे. 60 ते 65 टक्के मराठे हे कच्च्या घरांमध्ये राहतात. त्याचवेळी हे सुद्धा सत्य आहे की भूस्वामी असल्यामुळे राज्यसत्तेचे वाटेकरी मराठ्यांसारखे जातसमुह (खरेतर या जातसमुहांचा वरचा छोटा हिस्सा) नेहमीच राहिले आहेत. फक्त महाराष्ट्रापुरतेच बघायचे झाले तर 18 पैकी 10 मुख्यमंत्री, 55 टक्के आमदार, 105 पैकी 86 साखर कारखाने, 71 टक्के सहकारी समित्या मराठ्यांपैकी धनाढ्यांच्या ताब्यात राहिल्या आहेत. **सर्वच जात समुहांमध्ये ही वर्गीय दरी आज निर्माण झालेली आहे आणि तीव्र होत आहे.**

शेतीमधील संकटाचे मुख्य कारण आहे शेतीचे झालेले भांडवलीकरण, ज्यामध्ये शेती आता मुख्यत्वे बाजारासाठी केली जाते, मजुरी देऊन करवली जाते (मजुरांपैकी मोठा हिस्सा गरीब मराठ्यांचा आहे), खंडाचे रूप आता सामंती-खंड राहिलेले नसून भांडवली-खंड झाले आहे, आणि एका भांडवलदाराप्रमाणेच गुंतवणुकीचे हिशोब करून शेतीला उद्योगाप्रमाणे चालवणाऱ्या धनिक शेतमालक भांडवलदार वर्गाचा उदय झाला आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये बाजारात येणाऱ्या सर्व संपत्तीचे उत्पादन कामगार-कष्टकरी (शेतीमध्ये शेतमजुर, गरीब शेतकरी) करतात, त्याचा एक खूप छोटा वाटा मजुरांना मजुरीच्या रूपात दिला जातो, आणि मोठा वाटा भांडवली मालक (शेतींमध्ये धनिक शेतकरी, कुलक, इत्यादी) खिशात घालतात. गावांकडचे सावकार, आडते, ट्रान्सपोर्टची सुविधा देणारे, बी-बियाणे-खतांचे व्यापारी हे सर्वजण याच धनिक शेतकरी वर्गाचे हिस्से आहेत. परिणामी सर्व शेतकरी जातींमध्ये आज त्याच जातीमधला शोषक आणि शोषित वर्ग पैदा झालेला आहे, आणि मराठा, धनगर, इत्यादी कोणतीही जात त्याला अपवाद नाही. धनिक शेतकऱ्यांचा हाच 'वरचा' वर्ग आहे जो सतत सत्तेमध्ये वाटेकरी राहीला आहे.

या **धनिक शेतकऱ्यांचे आणि गरीब शेतकरी वा शेतमजुरांचे हित एक नाही!** आज धनिक शेतकरी हमीभावासारख्या मागणीसाठी लढत आहेत, जी महागाई वाढवते आणि परिणामी सरळ कामगार-विरोधी, शेतमजूर-विरोधी आणि गरीब शेतकरी-विरोधी मागणी आहे. धनिक शेतकऱ्यांचे भांडण हे सत्तेमधल्या वाट्याला टिकवण्याचे भांडण आहे. **शेतमजूर आणि गरीब शेतकरी (जो स्वत: अर्धमजूर आहे कारण फक्त स्वत:च्या शेतीतून त्याचे कुटुंब चालू शकत नाही), यांची आज प्रमुख मागणी आहे ती कायमस्वरूपी रोजगाराची, जीवनाच्या गरजा पुरवेल अशा मजुरीची, बेरोजगारी भत्त्याची!** शहरांमध्ये बिल्डर, छोटे-मध्यम उद्योगपती यांमध्ये सुद्धा मराठा (आणि इतर जातसमुहांचा सुद्धा) जातसमुहाचा एक अल्पसंख्य हिस्सा आहे. आय.टी., शिक्षणक्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, इतर पांढरपेशा नोकऱ्यांमध्ये सुद्धा एक छोटा हिस्सा गुंतलेला आहे. **बहुसंख्यांक मराठा जातसमुदायासमोर आज श्रमशक्ती विकून विविध प्रकारच्या कामगारांच्या रूपात काम करणे हाच एकमेव पर्याय उरलेला आहे.** तेव्हा स्वत:ला मराठा म्हणवत अस्मितावादी राजकारणामागे जाणाऱ्या कामगार वर्गाच्या या हिश्याने सुद्धा मूलभूत प्रश्न विचारत, आपल्या योग्य मागण्या काय असाव्यात याचा विचार केला पाहिजे!

आरक्षणाची मागणी मान्यही झाली तरी पदरात काय पडणार आहे? दरवर्षी जिथे जागाच हजाराच्या आसपास निघतात तिथे कोणत्याही जातसमुहाचा विचार केला तरी काही कोटी युवकांच्या रोजगाराचा प्रश्न अनुत्तरीतच आहे! या निघणाऱ्या जागा सुद्धा भांडवली बाजाराच्या स्पर्धेत तेच पटकावतील ज्यांच्याकडे जास्त संसाधने आहेत, थोडक्यात-वरचे वर्ग! हे समजणे आवश्यक आहे की मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, मुस्लिम आरक्षण या जातीय रूप घेतलेल्या मागण्या आहेत, परंतु या सर्वांच्या मूळाशी सर्व जातधर्मीय कामगार-कष्टकरी वर्गाची रोजगाराची वर्गीय मागणी आहे आणि अस्मितावादी राजकारणाच्या प्रभावामुळे ही मागणी जातीय आरक्षणाच्या रूपात समोर येत आहे.

मराठा जातसमुहातील असंतोषाला पाहून आज दु:साहसवादाच्या मार्गावरचे सी.पी. आय.(माओवादी) सारखे पक्ष सुद्धा आपल्या विचारधारात्मक कमजोरींमुळे अस्मितावादाच्या गर्तेत बुड्या मारू पहात आहेत आणि 'मराठा' तरुणांना भुलवत आहेत. ऐतिहासिक विकासाची गती सुद्धा ओळखू न शकलेल्या आणि 'लोकशाही क्रांती' करू पाहणाऱ्या या भरकटलेल्या मार्क्सवाद्यांच्या मागे न जाता, आज युवकांनी कामगार वर्गासोबत आपली नाळ जोडून रोजगार अधिकारासारख्या प्रश्नांवर क्रांतिकारी आंदोलनांचा आणि समाजवादाच्या निर्मितीचा मार्ग स्विकारला पाहिजे!

### लॉकडाऊननंतर वाढती बेरोजगारी: काही तथ्य

बेरोजगारी तर नेहमीचीच आहे आणि करोना लॉकडाऊन नंतर स्थिती भयावह झाली आहे, हे सत्य लपलेले नाही. डन ऍंड ब्रॅडस्ट्रीट या कंपनीने केलेल्या सर्वेक्षणानुसार 100-250 कोटींचा धंदा करणाऱ्या मॅन्युफॅक्चरींग आणि सुविधा क्षेत्रातील छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांपैकी 82 टक्के उद्योगांना करोना महामारीमुळे मंदीचा सामना करावा लागला आहे. नक्कीच या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात नोकऱ्या गेल्या आहेत. सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमीच्या (सी.एम.आय.ई.) मते 2020 सालामध्ये जवळपास 30 टक्के नियमित पगार घेणारे लोक स्वरोजगारी बनले आणि 13 टक्के लोक बेरोजगार झाले. एकून 98 लाख लोकांचा नियमित पगाराचा रोजगार गेल्याचा अंदाज आहे. यामध्ये मुख्यत्वे शिक्षणक्षेत्रातील किमान 14 टक्के लोक बेरोजगार झाले आणि 50 टक्के लोकांना नियमित काम गमावून अनियमित व्हावे लागले. आय. टी क्षेत्रातही 14 टक्के लोकांना नोकरी सोडावी लागल्याचा अंदाज आहे. याच अंदाजानुसार छोटे दुकान किंवा ऑफिस चालवणाऱ्या स्वरोजगारी लोकांपैकी किमान 12 टक्के लोकांचे उद्योग बंद पडले आणि ते बेरोजगार कामगार फौजेत सामील झाले. याशिवाय 8 टक्के लोकांना आपला धंदा बंद करून हातगाडी, रिक्षा, भाजीपाला विक्रीसारखी कामे चालू करावी लागली तर उरलेल्या लोकांपैकी अनेकांना आपला व्यवसाय बंद करून शेतीकडे जावे लागले आहे.

सी.एम.आय.ई.च्याच एका दुसऱ्या अंदाजानुसार 2020 मध्येच 1 कोटींपेक्षा जास्त नोकऱ्या गेल्या. यापैकी 50 लाख नोकऱ्या ह्या प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात गेल्या आहेत. आदरातिथ्य (रेस्टॉरंट, हॉटेल, लॉजिंग, इत्यादी) उद्योगातून 35 लाखाच्या आसपास नोकऱ्या गेल्या आहेत. शाळांच्या बस चालवणाऱ्या जवळपास 1.5 लाख ड्रायव्हरांच्या नोकऱ्या गेल्या. रिटेल विक्रीच्या उद्योगातून 2 लाखांच्या आसपास नोकऱ्या गेल्याचा अंदाज आहे आणि लॉकडाऊन संपल्यानंतरही जवळपास 1 लाख रोजगार परत आलेले नाहीत. दुसऱ्या लाटेदरम्यान एप्रिल-मे 2021 या काळात 1.72 कोटी छोटे व्यावसायिक आणि रोजंदारी कामगार बेरोजगार झाल्याचा अंदाज आहे; तर नियमित पगार घेणाऱ्यांपैकी 32लाख नोकऱ्या गेल्याचा अंदाज आहे. 2019-20 शी तुलना करता अजूनही 2.6 कोटी रोजगार कमी उपलब्ध आहेत.

इतर क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण झाला असे म्हटले जाते, परंतु गेलेल्या नोकऱ्यांच्या तुलनेत फारच कमी रोजगार निर्माण झाल्याचे दिसून येते. आरोग्य क्षेत्रामध्ये (नर्सेस, डॉक्टर्स, इतर कर्मचारी, वगैरे) फक्त 2.7 लाख नोकऱ्या निर्माण झाल्या. ऑनलाईन शिक्षण क्षेत्रात फक्त 1.3 लाख नोकऱ्या निर्माण झाल्या. गेले अनेक महिने बेरोजगारीचा दर उच्चांकीच राहिलेला आहे आणि 8 ते 10 टक्क्यांच्या दरम्यान आहे. थोडक्यात कोट्यवधी लोक ज्यांचे लॉकडाऊन दरम्यान काम हिरावले गेले, ते अजूनही बेरोजगारच आहेत. कोणत्याही मजूर अड्ड्यांवर गेले तर ही परिस्थिती डोळ्यादेखत बघायला मिळते, जिथे रोजंदारी काम आठवड्यातील 3 दिवस सुद्धा मिळणे दुरापास्त झाले आहे.

अर्थात लॉकडाऊन अगोदरही बेरोजगारी शिगेला पोहोचलेली होतीच. लॉकडाऊन अगोदर बेरोजगारीचा दर 8 टक्क्यांवर गेला होता आणि तो अनेक दशकांमधला उच्चांकी दर होता. भांडवली व्यवस्थेत बेरोजगारी असतेच, लॉकडाऊनसारख्या स्थितीमध्ये ती चिघळलेल्या जखमेसारखी होते. तेव्हा भांडवली उत्पादन व्यवस्था बेरोजगारी कशी निर्माण करते हे समजणे आवश्यक आहे.

### बेरोजगारीचा प्रश्न हा भांडवली उत्पादन व्यवस्थेने निर्माण केलेला, टिकवलेला प्रश्न आहे

भांडवली व्यवस्थेत उत्पादन साधनांवर खाजगी मालकी असते, आणि उत्पादन कशाचे व किती करायचे याचा निर्णय मालकच घेतात. भांडवली उत्पादन व्यवस्थेचे उद्दिष्ट रोजगार नाही, तर मालकांचा नफा आहे. मालकांचा नफा येतोच तो कामगारांच्या श्रमशक्तीच्या पिळवणूकीतून. सर्व संपत्ती कामगार आपल्या श्रमातून पैदा करतात, ज्याचा एक वाटा

पान 15 वर

## लॉकडाऊनमधले कामगारांचे जमिनी वास्तव: कामगार नाक्यावरून...

# कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेनंतर मानखुर्द कामगार नाक्यावरील कामगारांची हतबलता

**बिगुल पत्रकार**

सक्तीने थोपवलेल्या अनियोजित लॉकडाऊनमुळे कामगार-कष्टकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. 20 लाख कोटींचे पॅकेज आणि ‘धन्यवाद मोदी’च्या जाहिरातींमधून लपवलेले सत्य दिसून येते ते कामगार नाक्यांवर. मानखुर्द-गोवंडीमधील कामगार नाक्यांवर कामगार बिगुलच्या पत्रकारांनी कामगारांच्या तोंडून जाणलेले पुढील सत्य.

### “ज्याची सत्ता आहे, त्याच्याच बाजूने ही माध्यमे असतात, गरिबांना कोण बघते?”

उत्तरप्रदेशचे ‘कमलेश’ हे मागील दहा वर्षांपासून मुंबईतील मानखुर्द भागात राहत असून लेबर चौकात रोजंदारीवर मिळेल ती कामे करतात. लॉकडाऊनसंदर्भात कमलेशला विचारले असता ते म्हणतात, “लॉकडाऊनच्या काळात कोणताच धंदापाणी नसल्याने मला गावी जावे लागले. इथे मी नसतानादेखील इकडच्या खोलीचे भाडे व लाईट-बिल चालूच होते. मालकाने कोणतेच भाडे माफ केले नाही. ज्यामुळे काम करण्याची तयारी असतानाही काही काम नसल्याने मी आज कर्जबाजारी झालो आहे.” एकंदरीत कोणताही पर्याय नसल्याने लॉकडाऊन लावावे लागत असल्याचे मोदी सरकारचे म्हणणे आहे, असे कमलेश यांना सांगितल्यास ते म्हणतात, “लॉकडाऊनमध्ये फक्त गरिबांचाच मृत्यू झाला आहे, जसा नोटबंदीत रांगेत उभे असलेल्या लोकांनाच फक्त त्रास झाला नाही तर काहीजणांचा मृत्यूही झाला. त्याचवेळी श्रीमंतांच्या घरात नोटांच्या पोत्या सापडल्या ज्या परत कुठेच दिसल्या नाहीत. मोदी सरकारचे 15 लाख रुपये तर मिळाले नाहीत परंतु मोदींनी आपल्या निर्णयांनी 15 लाख लोकांचा जीव नक्कीच घेतला असेल.” प्रसारमाध्यमांबददल बोलताना कमलेश म्हणतात की “ज्याची सत्ता आहे, त्याच्याच बाजूने ही माध्यमे असतात, गरिबांना कोण बघते?”

### घरकाम नाही म्हणून वडापाव विकायचे ठरवले पण महागाईने तेही परवडत नाही.

मानखुर्द, लल्लूभाई कंपाऊंड येथे राहणाऱ्या 31 वर्षीय रुपाली शिंदे गेल्या 12 वर्षांपासून घाटकोपर येथे घरकाम करत होत्या, तर त्यांचे पती एका खाजगी कंपनीत नोकरी करत होते. प्रचंड महागाईच्या काळात व एकट्याच्या तुटपुंज्या पगारात घरखर्च पूर्ण करणे शक्य नसल्याने दोघेही कामाला जात असत. पुढे त्या सांगतात, “मार्च 2020 मध्ये पूर्वसूचना न देता सरकारने अंदाधुंद लॉकडाऊन लागू केले, तेव्हा हातातली कामे गेली आणि दोघा नवरा-बायकोला घरीच बसावे लागले. लॉकडाऊनपूर्वी दोघेजण कामाला जात असतानाही घरखर्च आणि बँकांची (लघु वित्त बँकांची) कर्जे फेडताना कसरत व्हायची, आता तर दोघे पण घरी असताना कर्ज कसे फेडावे आणि घरखर्च कसा चालवावा ह्याची सतत चिंता असते.” लॉकडाऊन मधली परिस्थिती बद्दल बोलतांना रुपाली पुढे सांगतात की, “लॉकडाऊनमध्ये सुरवातीचे 3 महिने त्यांच्या पतीला अर्धा पगार मिळत होता, त्यातून घरखर्च चालत होता. मोदींनीही 3 महिने खात्यावर 500 रुपये जमा केले. पण ते पुरेसे नव्हते. त्या म्हणतात, ‘सरकार बँकांचे हप्ते माफ करेल असं काही लोकांच्या तोंडून ऐकल होतं, पण पहिलं लॉकडाऊन जसं कमी झालं तसे लघु बँकांचे हफ्ते वसूल करायला माणसं घरी यायला लागली. हफ्ते भरायला पैसे नाहीत सांगितलं तरी ते ऐकायचे नाहीत. 8-9 महिन्यांचे हफ्ते भरायला वेगळं व्याजाने कर्ज घ्यावं लागलं. एक कर्ज फेडायला दुसरं कर्ज घ्यावं लागत आहे. सरकार सतत लॉकडाऊन लावतं, गाड्या बंद करतं, त्यामुळे घरकामालाही जाता येत नाही, आणि घरकाम करायला आता कोणी घेत ही नाही. पण काही काम नाही केलं तर खायचं काय? घरी बसून कोणी खायला देणार नाही म्हणून मी आता घरी वडापाव बनवून विकते. त्यातही तेलाच्या किंमती खूप वाढत चालल्यात त्यामुळे वडापाव विकणं पण परवडत नाही.” त्या सांगतात “यापुढे जर असाच लॉकडाऊन सुरु राहिला तर उपाशी मरायची वेळ येईल. ना सरकार मदत करत आहे ना कोणत्या सामाजिक संघटना मदत करत आहेत.”

### “बायको घरकाम करायला जायची त्यामुळे थोडा फार घरखर्च चालायचा. नाहीतर उपाशी मरण्याची वेळ आली आसती!”

हेमंत जाधव दररोज ऐरोली येथून मानखुर्द कामगार नाक्यावर कामाच्या शोधात येतात. ते सांगतात **“काम मिळालं तर करायचं,** नाही तर गप्प घरी निघून जायचं. महिन्यातून मोठया मुश्किलीने **10-12** दिवसंच काम मिळतं. पूर्वी **600** रुपये मजूरी मिळत असायची पण पावसाळा सुरू झाल्यापासून **400** रुपयेच मजूरी मिळते. तसेच पावसाळ्यात कारपेंटरची (सूतारकामाची) कामे मिळत नाहीत. काम करायची इच्छा असूनही काम मिळत नाही आहे. माझं नववी पर्यत शिक्षण झालंय, पर्याय नाही म्हणून नाक्यावर येऊन उभ रहावं लागतयं, तास-तासभर उभं राहूनही काम मिळत नाहीये. सरकारने आम्हाला जर नोकऱ्या दिल्या असत्या तर आमचे पण असे हाल नसते.”

हेमंत यांना लॉकडाऊनमध्ये प्रामुख्याने कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले असे विचारले असता ते सांगतात, “सगळीकडे बंद होता, त्यामुळे मला तर काम मिळतं नव्हतंच, बस सुविधा सर्वांसाठी सुरु होईपर्यत मी घरीच बसून होतो, त्यादरम्यान बायको घरकाम करायला जायची त्यामुळे थोडा फार घरखर्च चालायचा. नाहीतर उपाशी मरण्याची वेळ आली आसती! मदत तर कोणीच नाही केली, ना सरकार ने ना कोणत्या मंत्र्याने. उलट घरमालकाने भाडं नाही भरलं म्हणून खूप त्रास दिला. अजूनही थकलेलं घरभाडे भरत आहे. सरकारने आमच्या सारख्या लोकांना मदत करायला हवी होती”.

### “इथे स्वतःच्या खाण्याचे हाल आहेत, त्यात बायको लेकरांना कुठे घेऊन येणार?

28 वर्षीय आदर्श मानखुर्द अणुशक्ती नगर येथे राहतात. उत्तरप्रदेश मधील बस्ती या ठिकाणावरून 6 वर्षांपूर्वी ते कामाच्या शोधात मुंबईत आले. मुंबईत आल्यानंतर त्यांनी बिगारी कामगार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. त्यांचे संपूर्ण कुटुंब बस्ती या त्यांच्या मूळगावी राहत आहे. ते सांगतात, “इथे स्वतःच्या खाण्याचे हाल आहेत, त्यात अजून कुटूंबाला घेऊन येण्याचा प्रश्नच येत नाही. सकाळी रोज कामगार नाक्यावर येऊन उभा राहतो. काम मिळालं तर करतो, नाही तर गप्प रुमवर परतण्याशिवाय आमच्याकडे काही पर्याय राहिला नाहीये.”

आदर्श म्हणतात, “पहिल्या लॉकडाऊन मध्ये कामधंदा बंद असल्याने खायचे वांदे झाले होते. गावाला दोन वेळचं जेवण तरी मिळेल ह्या विचाराने, आपल्या मुळगावी परतलो. गावाला ही हालत जास्त चांगली नव्हती त्यामुळे नोव्हेंबरमध्ये पुन्हा मुंबईत आलो. 3-4 महिने मिळेल ते काम केलं. पण मार्च 2021 ला कोरोनाची दुसरी लाट रोखण्यासाठी सरकारने पुन्हा लॉकडाऊन लादले. पहिल्या लॉकडाऊनचा वाईट अनुभव गाठीशी असल्यामुळे, पुन्हा गावी निघून गेलो”. गावाला काम मिळत नसल्याने 20 दिवसांपूर्वीच ते मुंबईला परत आलेत. आदर्श सांगतात, “कामगार कष्टकऱ्यांनी एक दिवसही काम केलं नाही तरी त्यांना उपाशी रहावं लागत. सरकारी कर्मचाऱ्यांचा तर लॉकडाऊन मध्येही पगार सुरू असतो”.

### “लॉकडाऊन मध्ये खायला पैसे नाहीत अशात ‘हागायला’ पण पैसे द्यावे लागतात.”

मानखुर्द, मंडाला येथील चाळीत राहणारे मैनुद्दीन यांचे मुळगाव उत्तरप्रदेश येथे आहे. मुंबईत सन 2007 रोजी ते पहिल्यांदा आले होते. दोन वर्षे मुंबईत राहिल्यानंतर ते पुन्हा आपल्या मूळगावी रवाना झाले. त्याचदरम्यान त्यांनी दिल्ली, विमानी, जयपूर, जोधपूर सारख्या अन्य शहरांमध्ये मुख्यतः पेंटिंगची काम केली. आता मुंबईत पुन्हा परतल्या नंतर लॉकडाऊन मुळे रोजगार नसल्यामुळे बिगारीची कामे करतात. मैनुद्दीन सांगतात की, “कामगार नाक्यावर कामाच्या शोधात आल्यावर एक दिवस काम मिळालं तर चार दिवस काम मिळतं नाही. घरमालक रोज भाडं मागतो. दोन वेळच्या जेवणाला पैसे नाहीत तर भाडं कुठून भरायचं, त्यातही शौचालयास जाण्यासाठी ही पैसे द्यावे लागतात. लॉकडाऊन मध्ये खायला पैसे नाहीत अशात ‘हागायला’ पण पैसे द्यावे लागतात.” रोजंदारी विचारल्यावर मैनुद्दीन सांगतात, “एका दिवसाच्या कामानंतर 500 ते 600 रुपयांपर्यंत शेठ पैसे देतो. पण स्वतःला **400 रुपये ठेवतो. 10 कामगारांचे असे 400-400 रुपये कापल्यावर त्याला दिवसालाच 4000 रुपये मिळतात. काहीच काम न करता बसून खातात साले!!”**

### सरकारी दाव्यांचा खोटारडेपणा

अशा असंख्य उदाहरणांवरुन सरकारी दाव्यांची वास्तवाशी असलेली विसंगती स्पष्ट उघडी पडते. कोरोना संक्रमण रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या टाळेबंदीचा संपूर्ण देशभरातील कामगार कष्टकऱ्यांना सर्वात जास्त फटका बसला असताना देखील कामगारवर्गाच्या हितासाठी किंबहुना अस्तित्वासाठी या भांडवलदारी शासन व्यवस्थेने ठोस पावले उचललेली दिसत नाहीत. जी काही घोषणांपुरतीच मर्यादित असलेली तुटपुंजी “मदत” जमिनीपातळीवर क्वचितच वेळेत पोहोचल्याचे दिसून येते. कोरोना विषाणूमूळे मृत पावलेल्यांची संख्या नोंदवली जात असली तरी व्यवस्थेने घेतलेले असे अनेक असंख्य बळीं “लोकांनीच निवडून” दिलेल्या सरकारच्या दरबारी नोंदविले जात नाहीत. भाडे भरण्याची असमर्थता, मालकांकडून होणारी पिळवणूक, बँकांकडून होणारा छळ, मिळेल त्या मजूरीवर काम करावयास लागणारी हतबलता, हॉस्पिटल व आरोग्यसुविधांचा अभाव, आवश्यक नागरी सोयी-सुविधांची भयावह कमतरता, बेरोजगारी, कुपोषण, या सर्वातून निर्माण झालेला मानसिक ताण, इत्यादी यापूर्वीच व्यवस्थेने जन्म दिलेल्या समस्या लॉकडाऊन व सरकारच्या मनमानी कारभाराने कैक पटीने वाढविल्या आहेत. अशातच उद्योगपतींच्या पैशावर “लोकशाही”पद्धतीने निवडून आलेली सरकारं मात्र आपली मालकांसोबतची निष्ठा प्रामाणिकपणे जपताना दिसतात. ज्या काळात एकवेळचे पोटभर अन्नही मिळवू न शकलेल्या लोकांची संख्या देशात दिवसेंदिवस वाढत होती, त्याच काळात निरनिराळ्या कंपन्या, वित्तीय संस्था व भांडवलदार नफ्याचा नवा उच्चांक गाठताना होते. तसेच आतापर्यंत लॉकडाऊनची साधी झळही न लागलेल्या व आपल्या विविध दैनंदिन करमणुकीच्या उपक्रमात रमलेल्या मध्यमवर्गासही लॉकडाऊनचे चटके आता बसू लागले आहेत. अशातच मुख्य प्रवाहातील काँग्रेस-राष्ट्रवादी पासून भाजपा पर्यंतच्या कोणत्याही भांडवली पक्षाच्या राजकारणात तसेच बहुसंख्य प्रचलित भांडवली माध्यमांमध्ये कष्टकरी-कामगारवर्गाच्या समस्या केंद्रस्थानी नसल्याचे स्पष्टपणे आढळते. कष्टकरी-कामगारांच्या एकजुटीने निर्माण झालेल्या व शोषण-विरहीत नवीन समाजव्यवस्थेशिवाय ह्या सध्याच्या समाजव्यवस्थेने जन्म दिलेल्या सर्व समस्यांचे कायमस्वरुपी निवारण शक्य नाही.

# दिल्लीतील 2020 मधील धार्मिक हिंसेचा खटला आणि यू.ए.पी.ए. कायद्याचा गैरवापर

पान 1 वरून

जबाबदार धरण्यात आले. या संदर्भात पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या घटनांवरून दिसून येते की सरकारचे उद्दिष्ट हे फक्त या ना त्या कारणाने कार्यकर्त्यांना अटक करणे आणि तुरुंगात ठेवणे आहे.

या प्रकरणी अटकेत असलेल्या नताशा नरवाल, देवांगना कालिता आणि आसिफ तन्हा यांना 15 जून 2021 ला उच्च न्यायालयाने जामीन दिला आला. नताशा आणि देवांगना ह्या दोघी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या विद्यार्थिनी असून पी.एच.डी. संशोधनार्थी आहेत, सोबतच "पिंजरा तोड" या संघटनेच्या सदस्या आहेत. तर आसिफ तन्हा हा जामिया मिलीया विद्यापीठाचा विद्यार्थी आहे.

या तिन्ही विद्यार्थी कार्यकर्त्यांनी 2019 मध्ये नागरिकता दुरुस्ती विधेयक (सी.ए.ए.), राष्ट्रीय नागरिकता रजिस्टर (एन.पी.आर.) या कायद्यांना विरोध करणाऱ्या आंदोलनांमध्ये नेतृत्वकारी सहभाग घेतला होता. नताशा आणि देवांगना यांच्यावर 23 मे रोजी सी.ए.ए. या कायद्याला विरोध करणाऱ्या एका धरणे आंदोलनात सहभाग घेतल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याअंतर्गत दुसऱ्याच दिवशी दोघींना जामीन मंजूर करण्यात आला. दिल्ली न्यायालयाने हा जामीन मंजूर करत असतांना सांगितले कि, "देवांगना आणि नताशा ह्या दोघी सी.ए.ए. आणि एन.आर.सी. कायद्यांना विरोध करत होत्या आणि त्या कोणत्याच हिंसेच्या कृत्यात सहभागी नव्हत्या." त्यांनतर काही वेळातच या दोघींना दुसऱ्या आरोपाखाली "दंगल आणि हत्येच्या" प्रकरणात अटक करण्यात आली. त्यांच्यावर "धार्मिक हिंसेच्या अगोदर जाफराबाद मेट्रो स्टेशनवर गर्दीला भडकवण्याचा आरोप लावण्यात आला." या प्रकरणात देवांगना कलिता हिला जामीन देताना दिल्ली उच्च न्यायालय सांगते कि, "दिल्ली पोलीस असे पुरावे सादर करण्यात असमर्थ ठरले आहेत ज्याने हे सिद्द होईल की, "गर्दीला भडकवण्यात




आले होते." नताशा नरवालच्या बाबतीत देखील याच आशयाची टिपण्णी देत दिल्ली न्यायालयाने सांगितले कि, "पोलीसांद्वारे पुराव्याच्या रुपात सादर केलेल्या चित्रफिती (व्हिडिओ) मध्ये कोणतीच चित्रफित (व्हिडिओ) हे सिद्ध करत नाही की, नताशा नरवाल हिंसेत सहभागी होती किंवा तिने गर्दीला भडकवण्याचे काम केले!"

दुसऱ्यांदा अटकेच्या सहा दिवसांनंतर 30 मे 2020 रोजी एफ.आय.आर. क्रमांक 59 अंतर्गत नताशा नरवाल हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला तर 5 जून रोजी देवांगना कलितावर एफ.आय.आर. क्रमांक 59 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आसिफ़ इक़बाल तन्हा या विद्यार्थावर जामिया नगर पोलीस ठाण्यात 16 डिसेंबर 2019 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पुढे सहा महिन्यांनंतर 17 मे 2020 रोजी त्याला एफ.आय.आर. क्रमांक 298 अंतर्गत पकडण्यात आले होते तर 20 मे रोजी एफ.आय.आर. क्रमांक 59 मध्ये त्याचे नाव जोडण्यात आले. 28 मे रोजी सेशन कोर्टाने आसिफला जामीन मंजूर केला होता परंतु त्या अगोदरच त्याचे नाव एफ.आय.आर. क्रमांक 59 मध्ये जोडण्यात आले होते.

या सर्व घटनाक्रमातून स्पष्ट आहे की केंद्रातील मोदी सरकारच्या हुकूमावर काम करणाऱ्या दिल्ली पोलिसांचे उद्दिष्ट फक्त विविध खटल्यांद्वारे कार्यकर्त्यांना अडकवून ठेवणे आहे आणि यु.ए.पी.ए. सारखे लोकशाही-विरोधी कायदे वापरून हे काम केले जात आहे!

## यु.ए.पी.ए. कायदा: दमनाचे हत्यार!

दिल्ली हिंसाचार प्रकरणाने यू.ए.पी.ए. (UAPA) या कायद्याच्या वसाहतिक क्रूर चारित्र्यावर पुन्हा प्रश्न उपस्थित केले आहेत. अलीकडे काही वर्षापासून विरोधाच्या आवाजाला दडपून टाकण्यासाठी वापरण्यात येणारे कायदेशीर हत्यार म्हणजे "बेकादेशीर कृत्य प्रतिबंध कायदा, यू.ए.पी.ए. (UAPA)" हे आहे. इतिहास हेच सांगतो की इंग्रजांनी बनवलेल्या काळ्या कायद्यांपासून ते स्वातंत्र्यानंतर बनलेल्या टाडा, पोटा आणि यु.ए.पी.ए. सारख्या कायद्यांमागे खरे उद्दिष्ट दहशतवादाला आळा घालणे नव्हते तर राजकीय कार्यकर्ते, विरोधक यांची दडपशाही हेच होते. गृह मंत्रालय व एनसीआरबी (NCRB) च्या आकड्या नुसार यू.ए.पी.ए. (UAPA) या कायद्या अंतर्गत तपास पूर्ण होणे आणि आरोप सिद्ध होण्याचा दर 2.02 टक्के इतकाच आहे. 2016 ते 2018 या दरम्यान फक्त 27.00 टक्के प्रकरणात तपास पूर्ण करण्यात आला होता. यातून हे स्पष्ट होते की, आरोप सिद्ध होण्याचा दर एवढा कमी असतांना देखील या कायद्याचा गैरवापरच केला जात आहे.

खोट्या आरोपात अडकवलेला संबंधित व्यक्ती जर गरीब घरातील असेल तर त्याला सरकारी यंत्रणेशी लढणे शक्यच होत नाही. त्यामुळे तो स्व:तला निर्दोष सिद्ध करण्यात असमर्थ ठरतो आणि वर्षानुवर्षे तुरुंगात डांबले जाते. हा कायदा अटक करणे, तपास करणे, जामीन मिळू न देणे, गुन्हा दाखल न करता तुरुंगात ठेवणे, इत्यादी बाबींमध्ये तपास यंत्रणांना म्हणजेच सरकारला अमर्याद अधिकार देतो तर आरोपी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीला नाममात्र अधिकार देतो. दिल्ली धार्मिक हिंसेच्या प्रकरणामध्ये देखील हेच पाहायला मिळत आहे. या धार्मिक हिंसेनंतर शांततेत आंदोलन करत असलेल्या आंदोलकांना दडपण्यासाठी एफ.आय.आर. दाखल करण्याचे आणि अटकांचे सत्र सुरु झाले.याच सत्राचा भाग म्हणून एफ.आय.आर. क्रमांक 59 अंतर्गत नोंद करण्यात आला. यात 22 जणांवर यू.ए.पी.ए. अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले. यातून दिल्ली उच्च न्यायालयाने 15 जून रोजी 2021 रोजी नताशा नरवाल, देवांगना आणि आसिफ यांना जामीन दिला आहे. या दरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले कि, "दिल्ली पोलिसांनी दिलेल्या पुराव्याच्या आधारावर आरोप सिद्ध होत नसल्यामुळे जामीन देण्यात येत आहे." यु.ए.पी.ए. चा सर्रास गैरवापर चालूच आहे हे स्पष्ट आहे.

लोकशाहीमध्ये राजद्रोहासारखा (इंग्रजीत 'सीडीशन', ज्याला 'देशद्रोह' असे संबोधून सरकारशी द्रोह म्हणजे देशाशीच द्रोह अशी धारणा निर्माण करण्याचे काम देशात सत्तेवर बसलेल्या फॅसिस्ट शक्तिंनी केले आहे) कोणताही गुन्हा असू शकत नाही, कारण सरकारला विरोध करण्याचे स्वातंत्र्य ही तर लोकशाहीची मूलभूत अट आहे. यु.ए.पी.ए. सारखे कायदे हे बनवले जातातच ते मुळात जनतेच्या नागरी आणि लोकशाही अधिकारांवर हल्ला करण्यासाठी. आज अशा गैर-लोकशाही कायद्यांविरोधात एकजुट होऊन हे कायदे मूळातूनच रद्द व्हावेत ही धारणा जनतेत रुजवण्यासाठी झटण्याची गरज आहे.

# पुण्यात 133, दांडेकर पूल येथे झोपडपट्टी तोडण्याची कारवाई

पान 3 वरून

मालमत्ता आहे. सर्व जमिनी, उत्पादन साधनं मुठभरांचीच, म्हणूनच कामगार वर्गाला असुरक्षित ठिकाणी रहायला भाग पाडले जाते. कोणीही मृत्यूच्या दाढीत, घाणीच्या साम्राज्यात छोटी खुरटी कच्ची घरं हौस म्हणून बांधत नाही. परंतु नफेखोरी-लुटारू मालक वर्ग, शासन-प्रशासन कामगार-कष्टकरी वर्गाला अतिक्रमण करणारे संबोधतो. एका बाजूला शहरात आम्हीच बांधलेले लाखो फ्लॅट,बंगले खरेदीदार नाहीत म्हणून रिकामे पडून आहेत तर दुसरीकडे कोट्यवधी लोक नाईलाजाने झोपडवस्तीत राहत आहेत. हा अन्याय सुद्धा आपण स्विकारलेला आहे, म्हणूनच चालत राहतो!

### आवासाचा अधिकार मिळालाच पाहिजे!

जमीन ही तर नैसर्गिक साधन संपत्ती आहे मग ती सर्वांच्या सामुदायिक मालकीची का नाही? ही निसर्गाची देणगी मोठ्या प्रमाणात मुठभरांच्या ताब्यात गेली कशी? जमीन कुठल्याही व्यक्तीनी तयार केलेली नाही त्यामुळे त्यावर कोणाही व्यक्तीची, कंपनीची खाजगी मालकी असणंच खरंतर अनैसर्गिक आहे. **तेव्हा ह्या जमिनीवर राबणारा-कष्ट करणारा कोणीच 'अनधिकृत' नाही हे सरकारला ठणकावून सांगणे गरजेचे आहे.**

अजून एका महत्त्वाची गोष्ट. आपल्यापैकी अनेकांना कामाची ठिकाणं सतत बदलावी लागतात. भांडवली व्यवस्थेत कामाची कसलीही शाश्वती नाही. कोरोनाच्या काळातील अनियोजित लॉकडाऊनमुळे लाखो प्रवासी कामगारांचा जो लोंढा आपल्या घरांकडे हजारो किलोमीटर चालत गेला त्यावरून स्पष्ट झाले की शहरात राबूनही कोणतीही शाश्वती नाही! ग्रामीण भागातून किंवा इतर राज्यांमधून आपलेल्या प्रवासी कामगारांना शहरात सर्वात जास्त असुरक्षित स्थितीत जगावे लागते. त्यामुळे **काम मिळेल त्या ठिकाणी भोगवट्याच्या आधारावर आवासाचा अधिकार मिळणे अत्यंत गरजेचे आहे.** नाहीतर देशात कुठेही रोजगार करण्याच्या व मुक्त संचार करण्याच्या अधिकाराला काहीही अर्थ उरत नाही.

एकंदरीत महाराष्ट्रात तसेच, पुण्यातही बिल्डरांकडून एस.आर.ए. चे अनेक प्रकल्प रखडलेले असतांना, अनेक प्रकल्प हमी दिलेल्या 2-4 वर्षांचा कालावधीत सोडा 9-10 वर्ष होऊनही पूर्ण झालेली नसतांना, तुटपुंज्या घरभाड्यावर बाहेर राहणे अनेक कामगार-कष्टकऱ्याना शक्य नसतांनाही घरकुलं बांधून देण्याचे काम सरकार का करू शकत नाही?

आज ह्याच समस्या देशभरातील विविध वस्त्यांमध्ये राहणाऱ्या सर्वांच्या समोर आहेत. अपात्र करणे, सर्व प्रकारच्या माहितीचा अभाव, विकासकावर अविश्वास, प्रलंबित कामं, अपुरे भाडे, अस्वच्छ जागेत पुनर्वसन, बिल्डरांच्या फायद्यासाठी पोलिसी बळाचा वापर करून विस्थापन व याकरिता सर्व भांडवली पक्षांची व स्थानिक लोकप्रतिनिधींची आतून एकजूट हे सर्व प्रश्न अत्यंत गंभीर आहेत. एकंदर बिल्डर-ठेकेदार व त्यांचे पाळीव गुंड ह्यांच्या दहशतीचा वापर सर्रास सगळीकडे होतो. त्यामुळे मालकवर्गाच्या विरुद्ध सर्व कामगार-कष्टकऱ्यांनी एकजूट अत्यंत आवश्यक आहे. आज आपण सुपात आहोत. लढणाऱ्यांना साथ दिली नाही तर नक्कीच उद्या आपणही जात्यात जाणार आहोत. **कुठल्याही भांडवली पक्षाचे शेपूट न बनता आपल्या लढाऊ स्थानिक नागरिक समित्या बनवल्या पाहिजे आणि सामुहिक एकीच्या बळावर चांगली घरे मिळवण्याचा लढा उभा केला पाहिजे.**

# अफगाणिस्तानातून अमेरिकेची माघार, तालिबानची वाढती पकड

## साम्राज्यवादी स्पर्धेमध्ये अफगाणी जनतेची दुरावस्था चालूच

✎ अभिजित

एप्रिल मध्ये अमेरिकेचे राष्ट्रपती जो बायडेन यांनी अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्याने माघार घेण्याचे जाहीर केल्यानंतर, गेल्या दोन महिन्यांमध्ये आता तिथे तालिबानची पकड मजबूत होत चालली आहे आणि येत्या काही महिन्यात संपूर्ण अफगाणिस्तानावर तालिबानचे राज्य स्थापित होण्याची चिन्हे आहेत. एका शेजारच्या देशामध्ये धार्मिक कट्टरपंथी, दहशतवादी तालिबानचे सत्तेवर येणे भारतीय राजकारणावर परिणाम करणारे ठरेलच, सोबतच जागतिक राजकारणातही उलथापालथ केल्याशिवाय राहणार नाही. भारतातील कामगार वर्गाकरिता सुद्धा ही घटना धोक्याची घंटा आहे कारण देशांतर्गत राजकारणात या घटनेमुळे धर्मवादी, फॅसिस्ट शक्तींना अजून एक मुद्दा मिळणार आहे.

### पार्श्वभूमी

अफगाणिस्तानमध्ये असलेल्या तांबे, कोळसा, लोखंड, गॅस, सोने, लिथियम आणि थोरियम सारख्या खनिजांच्या अपार उपलब्धतेमुळे आणि भौगोलिक स्थान लक्षात घेता मध्य-पूर्व आशियातील तेलांच्या खाणींवर नियंत्रणाच्या दृष्टीने विविध साम्राज्यवादी देशांना नेहमीच अफगाणिस्तानात रस होता. भांडवली मार्गाला लागलेल्या सोवियत रशियाने साम्राज्यवादी धोरणांचा भाग म्हणून 1979 मध्ये अफगाणिस्तानात हस्तक्षेप केल्यानंतर, त्यांच्या विरोधात अमेरिकन साम्राज्यवाद्यांनी तालिबान, अल-कायदा सारख्या इस्लामिक दहशतवादी संघटनांना वित्त-पुरवठा करून पोसले, इतकेच नाही तर इस्लामिक कट्टरतावादाचे अभ्यासक्रम सुद्धा तयार करवून दिले आणि 'इस्लामी दहशतवादा'ला अशाप्रकारे अमेरिनेकेच जन्म दिला. अमेरिकन भांडवलदारांचे हित नेहमीच अफगाणिस्तानच्या साधन-संपत्तीमध्ये होते. अर्थात पोसलेला गुंडही जेव्हा शक्तीशाली आणि महत्त्वकांक्षी बनतो, तेव्हा पोषणकर्त्याच्या विरोधात जाऊच शकतो. तालिबानची अफगाणिस्तानावर राज्य करण्याची महत्त्वकांक्षा हे अमेरिका आणि तालिबानमध्ये वितुष्टाचे कारण बनले.

### अमेरिकन सैन्याचे परतणे: पराजयाची कबुली

अमेरिकेमध्ये 2001 साली 11 सप्टेंबर (9/11) रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटर वर दोन विमानांनी दहशतवादी हल्ला केल्यानंतर त्याचे निमित्त करून 'दहशतवादा'विरोधात युद्ध छेडल्याच्या बहाण्याने, मध्य-पूर्व आशियातील देशांमधील साधन संपत्तीवर कब्जा करण्याची मोहिमच अमेरिकेतील कंपन्यांच्या हिताकरिता आखली गेली. या युद्ध मोहिमेचा भाग म्हणूनच अफगाणिस्तान आणि इराकवर हल्ले केले गेले. तालिबानला हरवण्याचे निमित्त करत अमेरिकेने अफगाणिस्तानावर हल्ला केला, जेव्हा की खरे कारण अफगाणिस्तानच्या साधनसंपत्तीवर आणि अफगाणिस्तानद्वारे मध्य-पूर्वेवर नियंत्रणाचेच होते. अमेरिकेने अफगाणिस्तानामध्ये 'लोकशाही' स्थापन करवण्याच्या नावावर आपल्या हातातील बाहुले असलेले सरकार सत्तेवर बसवले, परंतु तालिबान विरोधात अमेरिकन सैन्य व अफगाणी राष्ट्रीय सैन्याचा लढा चालूच राहिला. या युद्धाने आजवर जवळपास 2 लाख अफगाणी नागरिकांचा जीव घेतला आणि अब्जावधी डॉलर्स खर्च झाले. अफगाणिस्तानातील सैन्याचे अस्तित्त्व अमेरिकेकरिता एक महाखर्चिक लचांड बनलेले होते आणि सैनिकीदृष्ट्या अफगाणिस्तानावर कब्जा करणे अमेरिकेला जमले नाही. याचीच परिणती शेवटी आता सैन्य माघारी घेण्यामध्ये झालेली आहे. इराक मधूनही अमेरिकन सैन्याला माघार घ्यावीच लागली होती आणि अफगाणिस्तानातूनही अमेरिकेने सैन्य मागे घेणे ही पराजयाची कबुलीच आहे.





### तालिबानचा अफगाणिस्तानावर कब्जा

अमेरिकन सैन्याने काढता पाय घेताच तालिबानने अफगाणिस्तानावर पूर्ण कब्जा मिळवण्यासाठी चढाई चालू केली आहे. परंपरागतरित्या कांधारच्या आजूबाजूला दक्षिण अफगाणिस्तानावर तालिबानचा वचक राहिला आहे, परंतु आता उत्तर अफगाणिस्तानातीलही अनेक शहरे तालिबानच्या ताब्यात जाऊ लागली आहेत. अफगाणिस्तानच्या कमकुवत सरकारकडे असे सैन्यबळ नाही की जे तालिबनाला निर्णायकपणे थोपवू शकेल. परिणामी संपूर्ण अफगाणिस्तानच तालिबानच्या ताब्यात जाण्याची स्थिती बनली आहे. अमेरिकन गुप्तहेर संस्थांच्या मते 6 महिन्यांमध्ये अफगाणिस्तान पूर्णत: तालिबानच्या कब्जात जाऊ शकतो. तालिबानचा कब्जा लांबला, तरीही देशामध्ये गृहयुद्धाची स्थिती कायम राहील. तालिबानसारख्या पुराणपंथी, धर्मवादी, कट्टरवादी, दहशतवादी सत्तेचा अर्थ आहे अफगाणिस्तानमध्ये लोकशाहीचा पूर्ण लोप आणि तेथील नागरिकांकरिता, विशेषत: महिलांकरिता, वाढती बंधने आणि नागरी अधिकारांचा, व्यक्तीस्वातंत्र्याचा अजून संकोच.

पाकिस्तानी तालिबान आणि अफगाणी तालिबान

पाकिस्तान मध्ये असलेले तहरीक-ए-तालिबान आणि अफगाणी तालिबान यांचे सख्य जुने आहे. दोन्हींमध्ये परस्तुन पठाणांचा भरणा आहे. अर्थात दोघांच्या स्वतंत्र राजकीय महत्त्वकांक्षाही आहेत. पाकिस्तानी तालिबानची मुख्य लढाई पाकिस्तान सरकारशी आहे. अफगाणी तालिबानच्या वाढत्या प्रभावामुळे पाकिस्तानही नक्कीच चिंतित आहे कारण यामुळे पाकिस्तानी तालिबानला मदत मिळू शकते आणि पाकिस्तान सरकार समोरील संकटे वाढू शकतात. अर्थात पाकिस्तानने जे ऐतिहासिकरित्या दहशतवादाला खतपाणी घातले आहे आणि कट्टरतावादाचे प्रशिक्षण देण्यात मदत केली आहे त्याचाही या सर्व घडामोडींमध्ये वाटा नक्कीच आहे.

### भारत सरकारची तालिबानसोबत खलबते!

हे समजणे आवश्यक आहे की हिंदुत्ववादी असो वा तालिबानी, अशा सर्व कट्टरतावादी/ हुकूमशाही/फॅसिस्ट शक्तींचे खरे उद्दिष्ट हे मालमत्ताधारी, भांडवलदार वर्गाच्या सत्तेचे रक्षण करणे हेच असते. त्यामुळेच तालिबानच्या 'इस्लामी' दहशतवादाचा वापर आपल्या हिंदुत्ववादी राजकारणाला वाढवण्यासाठी करणाऱ्या फॅसिस्ट भाजपला, आता जेव्हा तालिबान अफगाणिस्तानात सत्तास्थानी जाताना दिसत आहे, तेव्हा त्यांनी तालिबनसोबत गुप्त खलबते चालू केली आहेत. केंद्र सरकारने निश्चितपणे या गोष्टींना निराधार म्हणून फेटाळले आहे, परंतु अफगाणी पत्रकार सामी युसुफझाई यांनी ट्वीट करून ही माहिती जगासमोर आणली आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या परदेश दौऱ्यादरम्यान अचानक कतारला भेट देणे आणि कतार मधील अधिकारी मुतलाक बिन मजेद अल-कहतानी यांनी सुद्धा जयशंकर हे तालिबानला भेटल्याची पुष्टी करणे हेच दर्शवत की आग आहे, तेव्हाच धूर निघत आहे.

भारतातील अनेक उद्योगपतींची अफगाणिस्तानामध्ये जवळपास 3 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आहे, जी रस्ते, धरणे, वीजप्रकल्प इत्यादींमध्ये आहे; तसेच इराणमधील छबहार या बंदराचे व्यवस्थापन भारताकडे आहे, आणि या बंदराकडे जाणारे मार्ग अफगाणिस्तानातून आहेत. या सर्व गुंतवणूकीच्या सुरक्षिततेच्या हमीकरिता, तालिबानलाही लालूच दाखवत, आणि पाकिस्तानातील इतर दहशतवादी गटांसोबत तालिबानने हातमिळवणी करू नये याकरिता निश्चितपणे भारत सरकार तालिबानसोबत बोलणे करण्यास उत्सुक असणार आहे.

साम्राज्यवादी चीनला सुद्धा तालिबानसोबत नाते बनवण्यात रस आहे आणि चिंताही आहे; कारण की चीनच्या 62 अब्ज डॉलरच्या आर्थिक-महामार्ग प्रकल्पामध्ये अफगाणिस्तानची एक महत्त्वाची भुमिका बनू शकते; परंतु काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानी तालिबानने एका बसवर दहशतवादी हल्ला केला होता, ज्यामध्ये चिनी कामगारही मारले गेले होते. अफगाणी सीमेला लागून असलेल्या चीनमधील शिनजियांग या मुस्लिमबहुल प्रांतात अफगाणी तालिबानचा प्रभाव वाढू नये ही सुद्धा चीनला चिंता आहेच. परंतु अमेरिकन साम्राज्यवादाच्या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त फायदा करून घेण्यासाठी निर्माण झालेल्या संधीचा वापर करून घेण्यामध्ये सुद्धा चीनला नक्कीच रस आहे.

### राजकारणावर परिणाम: साम्राज्यवादी स्पर्धा वाढणार, फॅसिस्टांना आणखी एक मुद्दा मिळणार

तालिबनाच्या वाढत्या प्रभावामुळे, आणि अफगाणिस्तानावर त्यांचा कब्जा झाल्यास भारतासह दक्षिण आशियाच नव्हे तर जागतिक राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत. अमेरिका आणि चीनमधली वाढती साम्राज्यवादी स्पर्धा नवीन युद्धांच्या, वाढत्या दहशतवादी कारवायांच्या रुपाने समोर येऊ शकते. एकीकडे तालिबानशी छुप्या वाटाघाटी करणाऱ्या भाजपला देशांतर्गत राजकारणात 'भिती' निर्माण करण्यासाठी आणि दहशतवादाचा बागुलबुवा उभा करण्यासाठी आणि युद्धज्वर तापता ठेवत देशांतर्गत प्रश्नांपासून जनतेचे लक्ष भरकटवण्यासाठी अजून एक मुद्दा मिळणार. भारतातील कामगार वर्गाने हे विसरता कामा नये की अफगाणिस्तानातील लोकशाहीचा नाश, जनतेच्या अधिकारांवर हल्ला, तालिबानचा उदय या सारख्या घडामोडी या जगातील विविध देशांच्या साम्राज्यवादी धोरणांचा, भांडवली शक्तींच्या नफ्याच्या लालसेचाच परिणाम आहेत. याच भांडवली लालसेचे प्रतिनिधी म्हणूनच भारतात भाजप सारखे फॅसिस्ट पक्ष सत्तेत आहेत. धार्मिक कट्टरपंथ हे साम्राज्यवादी शक्तींनी आणि भांडवलदार वर्गानेच पोसलेलेच श्वापद आहे. साम्राज्यवाद आणि धार्मिक दहशतवादाविरोधात धर्मनिरपेक्ष, आंतरराष्ट्रीयतावादी कामगार चळवळच खऱ्या अर्थाने लढू शकते.

# भांडवलदारांच्या हिताकरिता लक्षद्वीप बेटांवर भाजपचे जातीय राजकारण!


✎ अभय

लक्षद्वीप बेटांवर फॅसिस्ट भाजप सरकारने उद्योगपतींच्या हिताकरिता धार्मिक विद्वेषाचे राजकारण पुन्हा एकदा खेळले आहे आणि भांडवलदारांच्या हितांसाठी, स्थानिक जनतेचे दमन करत, लोकशाही अधिकारांना गाडून टाकत, हुकूमशाही पद्धतीने राज्य करत भांडवली-हिंदुराष्ट्राचा आणखी एक प्रयोग पुढे नेला आहे.

## लक्षद्वीपची पार्श्वभूमी

भारताच्या दक्षिणेत केरळच्या समुद्रकिनाऱ्यापासून पश्चिमेला 200 कि.मी. अंतरावर समुद्रामध्ये एकूण 36 बेटांचा एक समूह आहे, या बेटांच्या समूहाला लक्षद्वीप म्हणून ओळखले जाते. 36 बेटांपैकी फक्त 10 बेटांवर मानवी वसाहती आहेत ज्यात एकूण लोकसंख्या सत्तर हजाराच्या जवळपास आहे. इथल्या जनतेचा मोठा हिस्सा नारळ संबंधित उद्योगात, मत्स्य उद्योगात किंवा पर्यटनाच्या उद्योगात काम करणारा आहे. लक्षद्वीप सांस्कृतिक रित्या केरळच्या संस्कृती जवळ आहे म्हणजे इथल्या संस्कृतीत आणि केरळच्या संस्कृतीत साम्य आहे. लक्षद्वीप मध्ये बहुसंख्य लोक मल्याळी भाषा बोलतात. त्याच बरोबर लक्षद्वीप मध्ये इस्लाम धर्म हा बहुसंख्यांक धर्म आहे. भारताच्या मुख्य भूप्रदेशापासून दूर असलेली ही बेटं निसर्गाने समृद्ध आहेत. काही दिवसांपूर्वी लक्षद्वीप मध्ये घडणाऱ्या घटनांबाबत जागोजागी चर्चा सुरू होती. हा लहानसा केंद्रशासित प्रदेश एवढा चर्चेत का आला, तिथे नेमकं काय काय घडलंय आणि घडतंय, लक्षद्वीप ची जनता #SaveLakshadweep का म्हणत होती हेच आपण या लेखातून पाहणार आहोत.

लक्षद्वीप हा एक केंद्रशासित प्रदेश आहे, म्हणजे लक्षद्वीप चा कारभार हा केंद्र सरकारकडे असतो. त्याच बरोबर लक्षद्वीप मधून लोकसभेसाठी एक खासदार निवडला जातो आणि स्थानिक पातळीवर पंचायत देखील निवडली जाते. परंतु केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे इथे सर्वाधिक अधिकार असतात इथल्या प्रशासकाकडे. प्रशासक म्हणजे एका केंद्रशासित प्रदेशावर केंद्र सरकारच्या वतीने राज्य चालवण्यासाठी नेमलेला व्यक्ती. या पदावर साधारणतः एखादा सरकारी आय.पी.एस. किंवा आय.ए.एस. अधिकारी नेमला जातो. परंतु डिसेंबर 2020 मध्ये जेव्हा पूर्वीचे प्रशासक दिनेश्वर शर्मा यांचा मृत्यू झाला तेव्हा पुढचा प्रशासक म्हणून प्रफुल्ल खोडा पटेल या व्यक्तीची नेमणूक केली गेली. प्रफुल्ल खोडा पटेल एखादा आय.पी.एस. किंवा आय.ए.स. नसून हा व्यक्ती एका मुरलेल्या संघी घरातून आलेला आहे ज्याने भाजपकडून गुजरातच्या 2007 साली झालेल्या निवडणुकीत आमदारकी मिळवली, एवढंच नाही तर 2010 मध्ये जेव्हा अमित शहाला सोहराबुद्दीन हत्येसंदर्भात कैदेत टाकले तेव्हा शहांकडची सर्व मंत्रिपदे पटेलकडे हस्तांतरित करण्यात आली, इतका हा भाजप/संघाचा विश्वासू माणूस. हा संघ भाजपचा प्रामाणिक चाकर 2012 ची गुजरात विधानसभा निवडणूक हरला, परंतु केंद्रात भाजपचं सरकार बसल्यावर दोनच वर्षात, 2016 मध्ये आधी दमण-दीव, आणि नंतर दादरा-नगरहवेलीचा याला प्रशासक बनवले गेले. इथे पटेलने केलेल्या दमनचक्राचा कारभार बघून व त्यावर प्रसन्न होऊनच प्रफुल पटेलला मग 2020 च्या डिसेंबर महिन्यात लक्षद्वीपचा देखील प्रशासक नेमले गेले. देशभरात यापूर्वीच राबवलेल्या फॅसिस्ट हिंदुत्ववाद्यांच्या लोकशाहीविरोधी, अल्पसंख्यांकांच्या विरोधातील आणि भांडवलाच्या सेवेसाठी च्या धोरणांना आणि कार्यक्रमालाच आता लक्षद्वीप मध्ये राबवण्याचा डाव प्रफुल्ल पटेल च्या नेमणूकीमागे आहे.




## गुंडांना आळा घालायच्या नावाखाली लोकशाही विरोधी कायदा

फॅसिस्टांना हवी असते एक हाती सत्ता. ती सत्ता ते जागोजागी फॅसिस्ट विचारांचं अनुकरण करणाऱ्या संघटनबद्ध कार्यकर्त्यांच्या फळ्या उभ्या करत बळकावतात. हिंदुत्ववादाचे संघटित होऊन पालन करणारे हेच कार्यकर्ते फॅसिस्टांना बळ देतात. परंतु लक्षद्वीप सारख्या ठिकाणी, जिथं प्रामुख्याने मल्याळी मुसलमान राहतात, तिथे हिंदुत्ववाद्यांच्या फळ्या कुठून उभ्या करणार? परंतु फॅसिस्ट दमनासाठी सत्तेत आल्यावर भांडवली राज्यसत्ता आणि तिच्या विविध अंगांचा देखील उपयोग करतात आणि याचाच एक भाग म्हणून नवनवे दमनकारी कायदे देखील आणले जातात. असाच एक कायदा आता लक्षद्वीप मध्ये आणला गेला आहे. 'लक्षद्वीप प्रिवेंशन ऑफ ॲन्टी सोशल ॲक्टिव्हिटीज रेग्युलेशन' किंवा 'गुंडा ॲक्ट' नावाच्या या नवीन कायद्यात कोणत्याही व्यक्तीला कायदेशीर प्रक्रियेविना सहा महिन्यापासून ते एका वर्षापर्यंत जेलमध्ये डांबून ठेवले जाऊ शकते. **वास्तवात लक्षद्वीप मध्ये गंभीर गुन्ह्यांचा आकडा नेहमीच शून्यात राहिलेला आहे, थोडक्यात अशी गुंडगिरी तेथे अस्तित्त्वातच नाही, तेव्हा स्पष्ट आहे की तिथे असा कायदा हा फक्त आणि फक्त राजकीय विरोधकांचा व जनतेचा आवाज बंद करण्यासाठीच हत्यार म्हणून वापरला जाणार आहे.** लोकशाही व जनतेसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संपवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या यु.ए.पी.ए., एन.एस.ए., टी.ए.डी.ए.(टाडा), पी.ओ.टी.ए.(पोटा) यांसारख्या कायद्यांच्या यादीतच हा नवा लक्षद्वीप मधला कायदा देखील येतो.

## पहिल्या लाटेत शुन्य रुग्ण, दुसऱ्या लाटेत दहा हजार; काय बिघडले?

लक्षद्वीपमध्ये कोरोनाची दुसरी लाट पसरण्याचे कारणच आहे 'प्रफुल्ल पटेल'. 2020 च्या डिसेंबर पूर्वी लक्षद्वीप मध्ये फारच कडक निर्बंध होते. तेथे आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सात दिवस सक्तीचे क्वॉरंटाईन होते. आणि यामुळेच संपूर्ण पहिल्या लाटेत लक्षद्वीप मध्ये एक सुद्धा रुग्ण नव्हता. मग डिसेंबर नंतर प्रफुल्ल पटेल यांची जशी नेमणूक होते, तसे सर्वच निर्बंध शिथिल केले जातात आणि फक्त एक निगेटिव्ह रिपोर्ट लक्षद्वीप मध्ये येण्यासाठी पुरेसा आहे हीच अट ठेवली जाते. अशात आज सहा महिन्यातच सत्तर हजार जनसंख्येपैकी दहा हजार हून जास्त लोकांना कोरोना झाल्याचे आढळले आहे तर 50 मृत्यू झाले आहेत. आणि याला सर्वस्वी जबाबदार प्रफुल्ल पटेल यांनी "सुधारलेले" निर्बंध.

## पुन्हा गौरक्षा, पुन्हा अल्पसंख्येच्या संस्कृतीवर हिंदुत्व थोपवणे.

लक्षद्वीप च्या संस्कृतीत आणि केरळच्या संस्कृतीत साम्य आहे. या दोन्ही जागी मल्याळी भाषा बोलली जाते. याच प्रमाणे खाद्यसंस्कृती देखील काही प्रमाणात एकसारखीच आहे. मांसाहार आणि खास करून बीफ इथे राहणाऱ्या जनतेच्या आहाराचा प्रमुख घटक आहे. इथे राहणाऱ्या मल्याळी मुसलमानांच्या खाद्यसंस्कृतीचा बीफ हा एक प्रमुख भाग असूनही नव्या प्रशासकाने 'लक्षद्वीप ॲनिमल प्रिझर्वेशन रेग्युलेशन' हा कायदा आणून बीफ बंदी आणली आहे. या नव्या कायद्यातून गुरंढोरं वाचवण्याचा विचार आहे की लक्षद्वीपच्या रहिवाशांच्या खाण्यावर - त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्यावर गदा आणली जात आहे कारण ते मुसलमान आणि मल्याळी आहेत याबद्दल जास्त विचार नाही करावा लागणार. देशभरात ज्याप्रकारे हिंदुत्ववादी फॅसिस्टांनी दहशत माजवून आणि मग कायदे बनवून गाईचं मांस खाणाऱ्यांना छळले त्याच पद्धतीने हा संघी पटेल लक्षद्वीप मध्ये करू पाहत आहे. एवढंच नाही तर या नव्या भाजप प्रणीत प्रशासकाने सर्व अंगणवाडी शाळांमध्ये दिले जाणारे जेवण फक्त शाकाहारी असेल असा निर्णय घेतला आहे. एका अशा भागात जिथे सर्वत्र समुद्रच आहे, शेती नसल्यासारखी आहे, जिथल्या स्थानिक संस्कृतीत प्रामुख्याने मांसाहार केला जातो, तिथे असे निर्णय सांस्कृतिक उत्पीडन करण्यासाठीच घेतले जात आहेत हे नक्की.

## पंचायतींसाठी नवे नियम

लक्षद्वीप मध्ये लोकशाहीच्या दोनच व्यवस्था अस्तित्वात आहेत. एक खासदार जो लोकसभेत निवडून जातो आणि स्थानिक पातळीवर प्रत्येक मानवी वसाहत असलेल्या बेटावर एक पंचायत व्यवस्था व या दहा पंचायतींची मिळून एक जिल्हा पंचायत. परंतु यातही आता प्रफुल्ल पटेल आल्यानंतर नव्याने काही नियम आणले आहेत. आता असे व्यक्ती ज्यांना दोन पेक्षा जास्त अपत्य आहेत त्यांच्यावर निवडणूक लढण्यापासून बंदी आणली आहे. याचं कारण काही स्त्रोतांनुसार राजकीय प्रतिस्पर्ध्यांना निवडणूक लढण्या पासून रोखणे असे आहे. त्याच बरोबर "मुसलमान 10-10 पैदा करतात... त्यांना आम्हीच रोखणार" असं आपल्या फॅसिस्ट पिल्लावळीत सांगण्यासाठी उचललेलं पाऊल आहे. एवढंच नाही तर पंचायतींकडून शिक्षण, आरोग्य, शेती, मासेमारी इत्यादी स्थानिक महत्वाच्या क्षेत्रांवरुन पंचायतींची निर्णय घेण्याची जबाबदारी काढून घेतलेली आहे. जेणेकरून आता लक्षद्वीप मध्ये बरेच निर्णय घेण्याचा एकमेव अधिकार प्रशासकाकडेच आहेत. याला सत्तेचे एक हाती केंद्रीकरण नाही म्हणणार तर काय? खासदाराकडे काही अधिकार आहेत परंतु खऱ्या अर्थाने तर लक्षद्वीपचे तमाम निर्णय घेण्याची शक्ती सत्ता ही प्रशासकाकडेच एकवटलेली आहे. त्यात प्रशासक निवडलेला नसून नेमलेला असल्यामुळे आता लक्षद्वीप मध्ये नेमकी लोकशाही आहे की नाही असं विचारल्यास त्याचे उत्तर हमखास नाही हेच होय.

## या सर्व घडामोडींमागचे गुपित: रिसॉर्ट मालकांचा नफा हेच यांच्या "विकासा"चे वास्तव

भाजप-आर.एस.एस. करिता हिंदुहित, हिंदुराष्ट्र, गोमातेचे रक्षण हे फक्त जनतेच्या भावना भडकावण्याचे आणि त्याद्वारे आपले भांडवलदारांच्या चाकरीचे खरे वास्तव लपवण्याचे साधन आहे. अन्यथा भारतात अनेक ठिकाणी गोवंश हत्याबंदीचे कायदे केले असले तरी गोवा किंवा ईशान्य भारतातील राज्यांमध्ये जिथे गोमांस खाणे हा संस्कृतीचा भाग आहे, भाजप या मुद्दावर उलटी भुमिका घेतो! लक्षद्वीपमध्येही मोठमोठ्या रिसॉर्ट चालवणाऱ्या भांडवलदारांच्या हितासाठीच आज धार्मिक विद्वेषाचे वातावरण तयार केले जात आहे.

लक्षद्वीप सारख्या नैसर्गिक रित्या संवेदनशील आणि संवर्धनाची गरज असलेल्या बेटांवरून सुद्धा कसा नफा पिळून काढता येईल, तिथेसुद्धा कसं श्रमशक्ती आणि निसर्गाची पिळवणूक करून नफेखोरी करता येईल याच प्रयत्नात आज रिसॉर्ट लॉबीचे भांडवलदार आणि त्यांच्या हितासाठी काम करणारे प्रफुल्ल पटेल सारखे फॅसिस्ट आहेत. समुद्रातील वैविध्यपूर्ण जीवसृष्टीतील अत्यंत चिंताजनक परिस्थितीत असलेली प्रवाळे या बेटांवर सापडतात, एवढेच नाही तर लक्षद्वीप मध्ये काही बेट पूर्णपणे प्रवाळाचीच बनलेली आहेत. असं असताना लक्षद्वीपमध्ये बेलगाम आणि रेटून "विकास" करण्यासाठी प्रशासकाच्या नेतृत्वात 'लक्षद्वीप डेव्हलपमेंट अथॉरिटी रेग्युलेशन' हा प्रस्तावित कायदा आणला जात आहे. या अंतर्गत कॅन्टोनमेंट वगळता इतर कोठेही सरकारच्या मर्जीने कोणताही भूभाग हा "विकासासाठी" ताब्यात घेऊन त्यात सरकार ठरवेल ते केले जाईल अशी सोय आहे. अर्थातच यातून पाहिजे तिथे रिसॉर्ट उघडून भांडवलदारांचे खिसे भरण्याचा आणि निसर्गाची वाट लावण्याचाच हेतू उघड दिसत आहे. एवढंच नाही तर या रिसॉर्ट्स् मध्ये दारू विक्रीसाठी सुद्धा आता पूर्ण छूट असल्यातंच जमा आहे कारण लक्षद्वीप मध्ये असलेला दारूबंदीचा निर्बंध काढून टाकण्यात आला आहे, तेही अशा परिस्थितीत जेव्हा बहुतांश स्थानिक हे दारूबंदी उठवू नका असं म्हणत होते. याच संदर्भात एक घटना फार महत्त्वाची आहे, ती म्हणजे जून महिन्यात कवरत्ती बेटाच्या समुद्रकिनाऱ्यावर ज्या मच्छीमारांनी मच्छीमारीसाठी शेड बांधले होते, असे बरेच शेड ध्वस्त करण्यात आले. मच्छीमारांना हाकलून समुद्र किनाऱ्याच्या जमिनीत दुसऱ्या कोणाचं हित असणार? रिसॉर्ट मालकांचंच! देशात सर्वत्र अडानी-अंबानी-टाटा-बिर्ला सारख्या भांडवलदारांचे हित जपणारा भाजप लक्षद्वीपमध्ये सुद्धा हेच करत आहे आणि त्याकरिता आता धर्मद्वेषाचे राजकारण करत आहे!

प्रफुल्ल पटेल नावाच्या संघ भाजपच्या

पान 12 वर

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प पाचवे)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.


पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या या अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरूवात करत आहोत. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.

**या साखळीतील पहिल्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतले की कामगारांनी कशाप्रकारे भांडवलाच्या सत्तेविरोधात लढण्याची सुरूवात केली आणि कशाप्रकारे चार्टीस्ट आंदोलन आणि 1848 च्या क्रांत्यांमधून जात कामगार वर्गाची चेतना आणि संघटीतपणा वाढत गेला. आपण कामगारांच्या मुक्तीच्या वैज्ञानिक विचारधारेचा विकास आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनलबद्दल) जाणले. गेल्या अंकात आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशाप्रकारे झाली आणि तिच्या रक्षणाकरिता कामगार वर्गीय जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. यावेळी आपण पाहूयात की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या नियमांना इतिहासात पहिल्यांदा व्यवहारात कसे लागू केले आणि हे दाखवले की "जनतेची सत्ता" खरोखर काय असते.**

— संपादक मंडळ

# कम्युनने दाखवले "अशी असते कामगार वर्गाची सत्ता"



'हॉटेल द विल' मधील कम्युनच्या सभासदांच्या बैठकीचे दृष्य. बुर्झ्वा सरकारच्या कारकिर्दीत हे एक आलिशान हॉटेल होते. याच्या हॉल मध्येच कम्युनची बैठक होत असे आणि अनेक महत्वपूर्ण आदेश प्रसारित केले जात असत.

**1.** कम्युनच्या निवडणुकीच्या पूर्वसंध्येला, त्यावेळेपर्यंत सरकार सांभाळत असलेल्या नॅशनल गार्डच्या केंद्रीय समितीने एक असाधारण घोषणा केली. कम्युनच्या नेतृत्वाच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि राजकारणाबद्दल समितीचा निकोप लोकशाही आणि क्रांतिकारी हेतू या घोषणेतून दिसून येत होता. यात म्हटले होते:

"आमचे मिशन पूर्ण झाले आहे. 'हॉटेल द विल' (जेथून कम्युनचे कामकाज चालवले जात होते) मध्ये तुमच्या निवडलेल्या प्रतिनिधींसाठी आम्ही जागा रिकामी करून देवू...या सत्याला तुम्ही विसरू नका की तुमची चांगल्या प्रकारे सेवा तेच लोक करू शकतात, ज्यांना तुम्ही तुमच्यातून निवडून दिले आहे आणि ज्यांनी तुमचे जीवन अनुभवले आहे. महत्वाकांक्षी आणि पद-हुद्द्याची भूक व लोभ असणाऱ्या लोकांपासून सावध रहा... अशा बोलघेवड्यांपासून सावध रहा की जे काही काम नाही करू शकत."

**2.** आता पर्यंत सगळ्या राजसत्तांचे हेच वैशिष्ट्य होते की राज्य चालवणारे लोक समाजाचे सेवक बनण्यापेक्षा मालक बनत होते. ही परिस्थिती रोखण्यासाठी कम्युनने दोन अचूक साधनांचा वापर केला. पहिला म्हणजे प्रशासकीय, न्यायिक आणि शैक्षणिक… सर्व पदांवरील व्यक्तींची नियुक्ती सार्वत्रिक मताधिकाराच्या आधारे निवडणुकीने होईल आणि या अटीसहीत की निर्वाचक कधीही निवडलेल्या व्यक्तीला परत बोलावू शकतील. याशिवाय उच्च आणि कनिष्ठ दर्जाच्या सर्व अधिकाऱ्यांना तेच वेतन मिळत होते जे इतर कामगारांना मिळत होते. कम्युन व्दारे कोणालाही दिला जाणारा सर्वाधिक पगार 6,000 फ्रँक होता. या दोन अभूतपूर्व निर्णयांनी कम्युनमध्ये पदाची लालसा आणि करियरवाद यांना जबरदस्त चपराक दिली.



पॅरिसच्या घेरेबंदीमुळे आर्थिक संकटाना तोंड देणाऱ्या अनेक कामगारांना त्यांची अवजारे आणि घरगुती सामानही गहाण टाकावे लागले होते. कम्युनने या सामानांचा लिलाव तात्काळ थांबवला आणि कामगाराना सामान परत देण्याचे आदेश दिले. वरील चित्रात एका दुकानात गहाण ठेवलेले सामान कामगारांना परत दिले जात आहे.


**3.** शत्रूसेनेने घेरलेले असताना आणि असंख्य संकटांना तोंड देत कम्युनच्या जनरल कौन्सिलने थोड्या वेळात खूप मोठे मोठे निर्णय घेतले. 16 एप्रिल रोजी कम्युनने ते सर्व कारखाने सुरू करण्याचा आदेश दिला, जे कारखाने त्यांचे मालक बंद करून पळून गेले होते. या कारखान्यांच्या कामगारांना सहकारी सोसायटी बनवण्याचा सल्ला दिला गेला. पाव बनवण्याच्या शेकडो कारखान्यांमध्ये रात्रीचे काम बंद करण्यात आले. रोजगार ऑफिस बंद केले गेले कारण हे ऑफिस दलालांच्या ताब्यात होते, जे कामगारांचे घाणेरड्या पद्धतीने शोषण करत असत. वेळेची कमतरता असल्यामुळे कम्युनचे काही आदेशच लागू केले गेले. (कम्युन 72 दिवस टिकले ज्यापैकी फक्त 60 दिवस त्यांची बैठक झाली.) स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला गेला. ऑक्टोंबर 1870 पासून एप्रिल 1871 पर्यंत, म्हणजे पॅरिसच्या घेरेबंदीच्या दिवसांचे सर्व घरभाडे रद्द करण्यात आले. व्याजखोरीवर बंदी घातली गेली आणि उधार-कार्यालयांमध्ये गहाण ठेवलेली कामगारांची सर्व अवजारे परत केली गेली

कम्युनने पहिल्यांदा धर्मनिरपेक्ष लोकशाही स्थापन करून ही घोषणा केली की, धर्म ही प्रत्येक व्यक्तिची खाजगी बाब आहे आणि राज्य व सरकारपासून धर्माला वेगळे ठेवले जाईल. परिणामी चर्चला सत्तेपासून वेगळे केले गेले. धार्मिक प्रतिष्ठानांच्या फालतू खर्चावर बंधने घातली गेली. चर्चच्या संपत्तीला राष्ट्रीय संपत्ती घोषित केले गेले. शाळा आणि शिक्षण संस्थामध्ये धार्मिक चिन्ह, फोटो, आणि पूजा व प्रार्थना याच्यावर बंधंन घातले गेले.



# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प पाचवे)

**4.** कम्युनमध्ये सर्वात महत्त्वाच्या हुद्द्यावर काम करणाऱ्या व्यक्तिला सुध्दा विशेषाधिकार नव्हते. कामगार आणि अधिकारी-मंत्री यांच्या वेतनामध्ये जे आकाश-पाताळा एवढे अंतर होते ते संपवले गेले. राज्याचे नेते जे वेतन घेत असत ते वेतन एका कुशल कामगाराच्या वेतनाएवढे होते. जास्तीचे काम करणे त्यांना अनिवार्य होते, परंतु त्यांना अधिक वेतन घेण्याचा किंवा कोणत्याही विशेष सुविधा घेण्याचा अधिकार नव्हता. ही एक अभूतपूर्व गोष्ट होती. या निर्णयांनी 'स्वस्त सरकार'च्या घोषणेला खऱ्या अर्थाने वास्तवात उतरवले होते. कम्युनच्या निर्णयांनी सरकारी कारभाराच्या आसपास रचलेल्या "रहस्य" आणि "विशिष्ठते"च्या त्या वातावरणाला समाप्त केले जे शोषक वर्गाकडून जनतेला मूर्ख बनवण्यासाठी वापरले जात होते. या निर्णयांनी राजकीय गोष्टींच्या संचालनाला सरळ-सरळ एका कामगाराच्या कर्तव्यात बदलून टाकले आणि राज्याच्या पदाधिकाऱ्याना "विशेष अवजारांनी" काम करणाऱ्या कामगारांमध्ये रूपांतरीत केले. कम्युनच्या नेत्यांवर कामाचे खूप मोठे ओझे होते. कौन्सिलच्या सदस्यांना कायदा तयार करण्याशिवाय काही कार्यकारी आणि सैनिकी जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागत होत्या.



कम्युन अंधराष्ट्रवाद, विस्तारवाद, आणि देशा-देशांमधील युद्धाच्या विरोधात होते. नेपोलियनने स्थापन केलेला विजय-स्तंभ यासाठी पाडला गेला कारण तो अंधराष्ट्रवाद, विस्तारवाद, आणि सैन्यवाद यांचे प्रतिक होता. ज्या दिवशी हा स्तंभ पाडण्यात आला त्यादिवशी गळ्यात लाल स्कार्फ बांधून आणि मोठमोठे लाल बॅनर घेवून हजारो लोक वेंदोम स्तंभाच्या आजूबाजूला जमा झाले होते. ही एक विशाल मूर्ती होती जिच्यावर नेपोलियन बोनापार्तची कांस्याची प्रतिमा लावलेली होती. उत्सवाचे वातावरण होते. आजूबाजूच्या इमारती सुध्दा लाल रेशमी कापडानी सजलेल्या होत्या. विजेत्या सम्राटाच्या डोक्यावर एक चरखी जोडली गेली, चरखी फिरली आणि डोके धाडकन जमिनीवर आले. लोक विजय स्तंभाच्या भग्न अवषेशावर चढून गेले, ज्याच्या आधारावर एक लाल झेंडा फडकत होता. आता हा कोणा एका देशाच्या विजयाचे प्रतिक स्तंभ नव्हता; तर तो आता मानवजातीचा विजय स्तंभ होता. कम्युनच्या शब्दात हा स्तंभ "बर्बरतेचे स्मारक, पाशविक शक्तींचे प्रतीक, सैन्यवादाचा उद्घोष, आंतरराष्ट्रीय कायद्यांना नकार, विजेत्याद्वारे पराजिताचा सतत अपमान, आणि फ्रेंच गणराज्याच्या तीन महान सिद्धांतांपैकी एक असलेल्या बंधुभावाचे उल्लंघन" होता


JOURNAL OFFICIEL
DE LA RÉPUBLIQUE FRANCAISE

कम्युनच्या आधिकारिक वर्तमानपत्राचे पहिले पान. यामध्ये कम्युनची सर्व कागदपत्रे, आदेश, बैठकांचे अहवाल, क्रांतिकारी पॅरिसच्या विविध संस्थाचे निकाल, नोटीसा, आणि सैन्यदलाचे अहवाल छापले जात होते. कम्युन जनतेपासून लपवून कुठलेही काम करत नसे. प्रत्येक कारवाई आणि निर्णयाची कल्पना जनतेला वेळोवेळी दिली जात होती आणि जनतेला यात भागीदार केले जात होते.



6 एप्रिलला "नॅशनल गार्ड"च्या 137 व्या बटालियनने त्या बदनाम गिलोतिनला बाहेर काढले आणि सार्वजनिकरित्या जाळून टाकले, ज्या गिलोतिनला वापरून गेल्या 75 वर्षात शेकडो लोकाना मृत्यूदंडाची शिक्षा दिली गेली होती. हे बुर्झ्वा राज्यसत्तेच्या दहशतीच्या नाशाचे प्रतिक होते.




महान चित्रकार गुस्ताव कुर्बे ज्याच्या चित्रांनी पूर्ण युरोपला आश्चर्यचकीत केले होते, तो कम्युन परिषदेचा सक्रिय सदस्य होता. तो कलाकाराच्या महासंघाचा अध्यक्ष होता आणि त्याला कम्युनच्या शिक्षण आयोगाचा सदस्य बनवले गेले होते. त्याने शाळांमध्ये सुधारांकरिता अनेक योजना बनवल्या, युध्दांमुळे बंद झालेली संग्रहालये परत चालू केली आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी एक आयोग बनवला. त्यावेळेपर्यंत स्त्रियाच्या सार्वजनिक शिक्षणाचा कोणी विचार देखील केला नव्हता.

**5.** आपण पाहत आलोत की सामंती आणि भांडवली व्यवस्थेमध्ये सरकार आपल्या अधिकाऱ्यांना खूप उच्चस्तरीय जीवनशैली आणि खूप-सारे अधिकार देतात जेणकरून त्यांना जनतेला चिरडणारा हुकूमशहा बनवले जावे. आपल्या उच्च पदावर विराजमान झालेले, मोठमोठे पगार घेणारे आणि जनतेवर रूबाब दाखवणारे, हीच आहे शोषकवर्गाच्या अधिकाऱ्यांची प्रतिमा. पॅरिस कम्युनच्या अगोदर फ्रांस मधील अधिकाऱ्यांचे वार्षिक पगार अशा प्रकारे होते: नॅशनल असेंब्लीच्या सदस्यांना 30,000फ्रँक; मंत्र्यांना 50,000 फ्रँक, प्रिव्ही कौन्सिलच्या सदस्यांना 1लाख फ्रँक; स्टेट कौन्सिलरला 1 लाख 30 हजार फ्रँक. जर एखादा व्यक्ती अनेक आधिकारिक पदांवर एकाचवेळी काम करत असेल तर तो त्या सर्व पदांचा एकत्र पगारही घेत असे. उदाहरणार्थ, नेपोलियन तृतीयचा आवडता राऊहेर हा एकाच वेळी नॅशनल असेम्बलीचा प्रतिनिधी, प्रिवी कौन्सिलचा सदस्य, आणि स्टेट कौन्सिलर असा तिनही पदांवर होता. त्याचा एकूण वार्षिक पगार 2 लाख 60 हजार फ्रँक एवढा होता. पॅरिसच्या एखाद्या कुशल कामगाराला एवढी रक्कम मिळवण्यासाठी 150 वर्षे काम करावे लागले असते. खुद्द नेपोलियन तृतीय याला सरकारी खजिन्यातून वार्षिक 2 कोटी 50 लाख फ्रँक दिले जात होते. त्याचे एकूण सरकारी वार्षिक उत्पन्न तीन कोटी फ्रँक एवढे होते.

फ्रेंच कामगार या स्थितीचा तिरस्कार करत होते. पॅरिस कम्युन स्थापन होण्याआधी सुध्दा त्यांनी ही मागणी केली होती की अधिकाऱ्यांच्या उच्च वेतनाची व्यवस्था रद्द करावी. कम्युनच्या स्थापनेसोबतच कामगार वर्गाची ही दीर्घ काळाची इच्छा सुद्धा पूर्ण झाली. 1 एप्रिल रोजी हा आदेश जारी झाला की कोणत्याही अधिकाऱ्याचे वेतन 6,000फ्रँक पेक्षा जास्त नसले पाहिजे. ही रक्कम त्यावेळच्या एखाद्या कुशल फ्रेंच कामगाराच्या वार्षिक मजुरीच्या रक्कमेबरोबर होती. पॅरिस कम्युनने आपल्या अधिकाऱ्यांनी एकाच वेळी अनेक वेतने घेण्यावर बंदी घातली.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प पाचवे)



त्या वेळचे एक कार्टुन—'वाईट काळ-चांगला काळ' यामध्ये हे दाखवले गेले की, कम्युनच्या उदयासोबत धनवान लोकांसाठी वाईट काळ आला होता आणि कामगारांसाठी चांगला काळ आला होता.

**6.** या सोबतच कम्युनने कमी वेतन असणाऱ्यांचे वेतन वाढवण्याचे काम सुद्धा केले, जेणेकरून वेतनमानातील अंतर कमी व्हावे. उदाहरणार्थ, टपाल खात्यात काम करणाऱ्या कामगारांचे वार्षिक वेतन 800 फ्रँक वरून 1,200 फ्रँक केले आणि 12,000 वार्षिक इतके जास्त वेतन घेणाऱ्यांचे वेतन 6,000 फ्रँक एवढे घटवले. कमी वेतन असलेल्या कामगारांच्या सोईसाठी कम्युनने ताबडतोब निर्णय घेतला की वेतना मधून होणारी सर्व कपात आणि दंड थांबवले जातील.

विशेषाधिकार, मोठे वेतन आणि एकाच वेळी अनेक पदांचे वेतन घेण्याच्या विरोधातील नियमांबद्दल कम्युनच्या काही सदस्यांनीच एक आदर्श घालून दिला. कम्युनचा एक सदस्य थीज, जो टपाल खात्यामध्ये प्रभारी अधिकारी होता, त्याला नियमाने 500 फ्रँक वेतन मिळू शकत होते,पण तो फक्त 450 फ्रँक घ्यायला तयार झाला. कम्युनचे जनरल व्रोब्लवस्की यांनी स्वेच्छेने अधिकारी दर्जाचे आपले वेतन सोडून दिले आणि एलिस महालात दिलेल्या सदनिकेत रहाण्यास नकार दिला. त्यांनी घोषणा केली की "एका जनरलची जागा त्याच्या सैनिकांमध्ये असते". कम्युनच्या कार्यकारणी समितीने जनरल पद समाप्त करण्यासाठी सुद्धा एक प्रस्ताव पास केला. 6 एप्रिलच्या आपल्या प्रस्तावात समितीने म्हटले की "जनरल हे पद नॅशनल गार्ड्स्या लोकशाही संघटनेच्या तत्त्वांशी मेळ खात नाही याला लक्षात घेता...जनरल हे पद समाप्त करण्याचा निर्णय घेतला जात आहे". परंतु हा निर्णय लागू करण्यास कम्युनला वेळ मिळाला नाही.

**7.** पॅरिस कम्युन मध्ये जनसमुदाय खरोखरचा मालक होता. कम्युन जोपर्यंत अस्तित्वात होते तो पर्यंत जनसमुदाय व्यापक प्रमाणात एकत्र होता आणि सर्व महत्त्वाच्या राजकीय मामल्यांमध्ये लोक आपापल्या संघटनामध्ये विचार-विनिमय करत असत. रोज क्लब मिटींगांमध्ये 20,000 कार्यकर्ते भाग घेत असत, जेथे वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या सामाजिक आणि राजकीय विषयांवर आपले प्रस्ताव किंवा टीका मांडत असत. ते क्रांतिकारी वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांमध्ये लेख आणि पत्रे लिहून सुद्धा आपल्या आकांक्षा आणि मागण्या मांडत. जनसमुदायांचा हा क्रांतिकारी उत्साह आणि पुढाकार हे कम्युनच्या शक्तीचे स्रोत होते.

कम्युनचे सदस्य जनसमुदायाच्या विचारांवर विशेष लक्ष देत असत. याकरिता ते लोकांच्या वेगवेगळ्या बैठकामध्ये भाग घेत आणि त्यांच्या पत्रांचा अभ्यास करत. कम्युनच्या कार्यकारणी समितीच्या महासचिवांनी कम्युनच्या सेक्रेटरीला पत्रात लिहीले की: "आम्हाला रोज लिखित किंवा तोंडी दोन्ही स्वरूपात खूप सारे प्रस्ताव मिळतात, ज्यामध्ये काही व्यक्तींद्वारे, काही क्लब मार्फत आणि काही आंतरराष्ट्रीयच्या शाखांद्वारे पाठवलेले असतात. हे प्रस्ताव अनेकदा उच्च कोटीचे असतात आणि कम्युनतर्फे त्यांवर विचार-विनिमय झाला पाहिजे". वास्तवात कम्युन जनसमुदायाच्या प्रस्तावांचा गंभीरतापूर्वक अभ्यास करत असे आणि त्यांचा स्विकार करत असे. कम्युनचे अनेक महान आदेश जनसमुदायाच्या प्रस्तावांवर आधारीत होते, जसे की, राज्याच्या पदाधिकाऱ्यांसाठी मोठ्या वेतनाची व्यवस्था रद्द करणे, थकीत भाडे रद्द करणे, धर्मनिरपेक्ष शिक्षण व्यवस्था लागू करणे, बेकरी कामगारांसाठी रात्र पाळीचे काम बंद करणे, इत्यादी.



अजून एक कार्टून 'ल पेर दुशेनचा राग'. ल पेर दुशेन हे एक लोकप्रिय क्रांतिकारी वर्तमानपत्र होते. हे कार्टून कम्युनचे शत्रू, थियेर सरकारचे नेते आणि वर्सायच्या प्रतिक्रियावादी लोकांचा पर्दाफाश करण्यात क्रांतिकारी नियतकालिकाची भूमिका दाखवत होते.







19 एप्रिल रोजी कम्युनने संपूर्ण पॅरिसमध्ये चिटकवलेल्या मोठ-मोठ्या पोस्टर्स मधून त्या लक्ष्यांच्या घोषणा दिल्या ज्यांसाठी ते लढत होते. "गणराज्य मजबुत बनवणे...कम्युनच्या संपूर्ण स्वायतत्तेचा फ्रांसच्या सर्व भागांमध्ये विस्तार... व्यक्तिगत स्वातंत्र्य, अंतरात्म्याचे स्वातंत्र्य आणि श्रमाच्या स्वतंत्रतेची संपूर्ण खात्री..."

याचा शेवट या शब्दांनी झाला: "18 मार्चला जनतेच्या पुढाकाराने सुरू झालेल्या कम्युनच्या क्रांतीने एका नव्या राजकीय युगाची सुरवात केली आहे, जी प्रयोगात्मक, सकारात्मक, आणि वैज्ञानिक आहे. यासोबत जुन्या पद्धतीच्या शासकीय आणि धार्मिक दुनियेचा, सैन्यवादाचा, एकाधिकारशाहीचा आणि सर्व विशेषाधिकारांचा शेवट होणार आहे, जे कामगार वर्गाच्या गुलामीचे आणि राष्ट्रांच्या दुर्भाग्याचे व यातनांचे कारण आहेत.




कोणत्याही क्षणी हल्ला करण्यासाठी तयार असलेल्या वर्सायच्या सेनेने घेरलेल्या पॅरिसमध्ये, सतत 24 तास, संपूर्ण शहरात रस्त्यावर, चहाच्या हॉटेलांमध्ये, चर्चच्या आवारात, लोकांच्या छोट्या-छोट्या सभा आणि सल्ला मसलती चालत, ज्यांमध्ये लोक मिळून निर्णय घेत असत.



रस्ते प्रत्येक वेळी भरलेले असत. प्रत्येक ठिकाणी चर्चा चालत असत. कठिण काळातही लोक वस्तूंची आपापसात देवाण-घेवाण करत असत. रस्ते पोलिसांशिवाय सुद्धा सुरक्षित होते.

**8.** जनसमुदाय कम्युन आणि तिच्या सदस्यांच्या कामाची काळजीपूर्वक पडताळणी सुद्धा करत असत. त्या काळातील तृतीय प्रांताच्या कम्युन क्लबचा एक प्रस्ताव सांगतो की : "जनताच मालक आहे... ज्या लोकांना तुम्ही निवडले आहे, ते जर ढेपाळलेपणाचे वा हाताबाहेर जाण्याचे संकेत देत असतील, तर त्यांना पुढे जाण्यासाठी धक्का द्या, जेणेकरून तुमचे लक्ष पूर्ण होईल — म्हणजेच आपल्या अधिकारांसाठी चालू असलेल्या लक्षांपर्यंत संघर्षाद्वारे पोहचू शकू". प्रतिक्रांतिकारी, पळपुटे, आणि गद्दार यांच्याविरुध्द दृढपणे पाऊल न उचलण्याबद्दल, स्वत: कम्युनद्वारेच प्रसारित आदेशांना तात्काळ लागू न करण्याबद्दल, आणि कम्युनच्या सदस्यांमधे एकतेच्या अभावाबद्दल जनसमुदायाने कम्युनवर टीका केली. उदाहरणार्थ, 'ल पेर दुशेन' वर्तमान पत्रातील 27 एप्रिलच्या अंकामध्ये छापले गेलेले एका वाचकाचे पत्र हे सांगते की : " कृपया वेळो-वेळी कम्युनच्या सदस्याना धक्के देत रहा, त्यांना सांगा की झोपू नका, आणि आपल्याच आदेशांना लागू करण्यात कुचराई करू नका. त्यांनी आपापसातील भांडण मिटवून टाकावीत कारण विचारांच्या एकतेनेच ते अधिक शक्तिनिशी कम्युनचे रक्षण करू शकतात.

पॅरिसच्या घेरेबंदीच्या काळात सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक रहिवासी इलाक्यात उभ्या राहिलेल्या असंख्य तदर्थ संघटना पुढेही टिकून राहिल्या आणि कम्युनच्या सहकारीही बनल्या. या स्थानिक सभा, ज्यामध्ये मुख्यत्वे स्थानिक कामगार सामील होत होते, कम्युनच्या कामावर देखरेखही ठेवत असत, आणि आपल्या वतीने काही कामांना पूर्णत्वास नेत असत. कुठे ते शाळेसाठी शाळेच्या वस्तु मिळवत असत; तर कुठे अनाथ मुलांसाठी घर मिळवून देत असत. अशी अनेक उदाहरण होती. परंतु एक गोष्ट प्रत्येक ठिकाणी खरी होती की कम्युनने साधारण कामगारांच्या पुढाकाराला जागे केले होते, ते पुढे येऊन त्या कामांना सांभाळू लागले होते, ज्यांना अगोदर मोठमोठे पगार घेणारे प्रशासकीय अधिकारी अथवा विशेषज्ञ करत असत.



एका क्रांतिकारी पॅरिस क्लबचे दृष्य. कम्युनच्या काळात लोकांना एकत्र आणि सक्रिय करण्यामध्ये पॅरिसच्या क्रांतिकारी क्लब्जनी मोठी भुमिका बजावली होती.

...पुढील अंकात चालू

# तुमच्या जळवांचा ऱ्हास

पान 13 वरून

जागा भांडवलशाहीने घेतली होती, परंतु हिंदुस्तानात तोपर्यंत सामंतशाहीच चालू होती. तरीही इंग्रजी भांडवलदारांनी आपल्या देशाप्रमाणे हिंदुस्तानातील सामंतशाहीला लुप्त होऊ दिले नाही. याचाच परिणाम आहे की जरी भारतवर्षावर इंग्रजी भांडवलशाहीचे शासन आहे तरीही देशांतर्गत सामंतशाहीला संस्थानांच्या आणि मोठमोठ्या जमीनदाऱ्यांच्या रूपात जपले गेले आहे. भांडवलशाही माणसाला अर्थदास बनवते आणि सोबतच बेरोजगारी निर्माण करून त्यांना नरकयातना भोगायला लावते, ही गोष्ट तर आता स्पष्ट झाली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत बाजार आणि साम्राज्यविस्ताराकरिता आपसात लढणाऱ्या युरोपातील राज्यशक्तींनी हे सुद्धा दाखवून दिले की भांडवलशाही युद्धांचे प्रमुख कारण आहे.

याचवेळी जर्मनीमध्ये एक विचारवंत जन्माला आला, ज्याचे नाव होते कार्ल मार्क्स. त्याने सांगितले की बेरोजगारी आणि युद्ध भांडवलशाहीचे अनिवार्य परिणाम राहतील, जोपर्यंत भांडवलशाहीच्या संरक्षणामध्ये यंत्रांचा वापर वाढत जाईल, बेरोजगारी आणि युद्ध तितकेच भयावह रूप धारण करत जातील – त्याने यातून वाचण्याचा एकच उपाय सांगितला – साम्यवाद. जर्मनी, फ्रांस – जिथे कुठे त्याने आपले हे विचार प्रकट केले, तेथील सरकारे त्याच्या मागे पडली. भांडवलदार समजले की साम्यवाद त्यांची मूळे कापून टाकण्यासाठी आहे. त्यामध्ये तर सर्व संपत्तीचा मालक व्यक्ती न राहता समाज बनेल. त्यावेळी प्रत्येकाला आपल्या योग्यतेनुसार काम करावे लागेल आणि आवश्यकतेनुसार जीवनाची साधनं मिळतील. सर्वांसाठी प्रगतीचा मार्ग एकसारखा खुला राहील. कोणी कोणाचा ना नोकर असेल, ना दास. आता धनिकांना हे कसे पसंत पडले असते? परंतु अजुनही मार्क्सचे हे विचार हवेतच गुंजत होते. कामगारांवर त्यांचा परिणाम अत्यंत हलका पडत होता, त्यामुळेच भांडवलदारांचा विरोध तीव्र नव्हता – खास करून जेव्हा त्यांनी पाहिले की एकेकाळी आग ओकणारे प्रलोभने समोर दिसताच भांडवलशाहीचे सहाय्यक बनू शकतात. जगातील जळवांना वाटले की साम्यवाद नेहमीच आसमानी गोष्ट बनून राहील आणि त्याला कधी ठोस जमिनीवर उतरण्याची संधी मिळणार नाही.

भांडवलशाही हळूहळू प्रत्येक देशात वाढत होती. युरोपात तर तिची गती खूपच तीव्र होती. शेवटी सैनिकांचा देश जर्मनी सुद्धा तिच्या लोंढ्यातून वाचला नाही. उलट प्रतिभाशाली जर्मनीने यंत्रांच्या शोधामध्ये आणि वापरात अजूनच जास्त योग्यता दाखवली. भांडवली सरकारांनी डावपेच वापरून जगाचे हिस्से वाटून घेतले. जर्मनीने पाहिले की तिच्यासाठी तर कुठेच जागा शिल्लक नाही. त्याकरिता जर्मनीने अनेक वर्षे तयारी केली कारण तिला माहित होते की हत्यारांच्या जोरावर नवीन बाजार मिळू शकतात. याच आकांक्षेचा, याच तयारीचा परिणाम होता 1914 चे पहिले महायुद्ध. भांडवलदार कारखान्यांमध्ये गरीबांचे रक्त पिऊन तृप्त नव्हते. ते बाजार आणि नफ्याला लुटण्यासाठी मोठ्या प्रमाणात नरसंहार करू पहात होते. जे म्हणतात की महायुद्ध ऑस्ट्रीयाच्या राजपुत्राच्या हत्येमुळे झाले, ते एकतर भोळे आहेत किंवा जाणून बुजून खोटे बोलत आहेत. युद्ध झाले होते जळवांच्या रक्ताच्या लालसेपोटी. जर्मनीच्या जळवा हरल्या. फ्रांस आणि इंग्लंडच्या जळवा जिंकल्या. या जळवांच्या लढाईत एक फायदा झाला की जगातील सहाव्या हिश्श्यावरील – रशियावरील – जळवांचे राज्य संपले. आता तिथे इमानदारीने कमावून खाणाऱ्यांचे राज्य आहे. सुरुवातीला जगातील जळवांनी पूर्ण प्रयत्न केला की तिथे साम्यवादी शासन बनू नये. पण रशियातील कामगार आणि शेतकऱ्यांनी प्रत्येक प्रकारचा त्याग करून, जीवावर खेळून आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. लेनिनच्या नेतृत्वामध्ये स्थापन झालेले साम्यवादी सरकार आज जगभरातील जळवांच्या डोळ्यांमध्ये काट्याप्रमाणे खुपते आहे. सगळे भांडवली देश बघत आहेत की जगातील सर्व कामगार-शेतकरी रशियाकडे स्नेहाने पाहतात आणि त्यांच्याकडून अंत:प्रेरणा घेतात.

महायुध्दाच्या शेवटी जळवांचा रक्तपिपासू नंगानाच पाहून तसेच रशियन क्रांतीने प्रभावित होऊन युरोपातील कितीतरी देशांच्या कामगारांमध्ये साम्यवादाचा जोर वाढला. सामग्री तयार होती, जिचा वापर करून तेथे सुद्धा साम्यवादी शासन स्थापित होऊ शकले असते. परंतु श्रमजीवींचे नेतृत्व ज्या कमजोर मनाच्या शिक्षितांच्या खांद्यावर होते, त्यांनी आपल्या भ्याडपणाला आणि कमजोरीला जनतेच्या माथी मारले आणि अशाप्रकारे श्रमजीवी-जागृतीचा तो वेग विस्कळीत झाला. भांडवलदार महत्त्वकांक्षी साम्यवादी नेत्यांना – जे आपसात स्पर्धा आणि कलहामुळे कोणत्याही मोठ्या गोष्टीची आशा ठेवून नव्हते – आपल्याकडे ओढू शकत होते, आणि याकरिता फक्त दोन गोष्टींची गरज होती. एकतर आदर्श-द्रोही नेत्यांना नेतृत्व दिले जावे, आणि यामध्ये भांडवलशाहीचे कोणतेही नुकसान नव्हते, दुसरे, त्यांना थैल्यांची मदत दिली जावी आणि यात भांडवलदारांना वाईट वाटण्यासारखे काहीच नव्हते कारण नाहीतर कामगार त्यांच्याकडून सर्व थैल्या हिसकावून घेणार होते. अशाप्रकारे भांडवलशाहीने नवे रूप – 'फॅसिझम'चे रूप धारण केले. आपले खरे उद्दिष्ट लपवून सामंतशाहीचा विनाश करणाऱ्या भांडवलशाहीची हातसफाई वापरली आणि राष्ट्रीयतेच्या नावावर जनतेला आपल्या झेंड्याखाली एकत्र होण्याचे आवाहन केले. अनेक वर्षांपासून कामगार आणि शेतकरी आपल्या शिक्षित मध्यमश्रेणीच्या साम्यवादी नेत्यांच्या भ्याडपणाला आणि विश्वासाला कंटाळले होते. त्यांनी फॅसिझमला राष्ट्रीय पुनरूज्जीवनचा संदेशवाहक समजत मदत केली आणि अशाप्रकारे पुन्हा भांडवलशाहीला मजबूत केले. शोषक आणि शोषितांना कायम ठेवणारा फॅसिझम श्रमिकांच्या दु:खाला आतून तर संपवू शकत नव्हते, म्हणून त्यांनी दुसऱ्या देशांकडे रोख वळवला. इटलीमध्ये फॅसिझमच्या जन्माचा हा इतिहास आहे.

जर्मनीच्या जळवा सुद्धा महायुद्धात हरल्या, पण विजेते कधीच पराभूत जळवांना पूर्णत: नष्ट करू पहात नाहीत. त्यांना माहित होते की जर्मनीमधील जळवांचा लोप, हा इंग्लंड आणि फ्रांसवर मोठा प्रभाव पाडेल. त्यामुळे त्यांनी जर्मनीला जगू दिले. लढाईनंतर जर्मनीचे श्रमजीवीं सुद्धा आपल्या देशातील जळवांच्या अत्याचारांना वैतागलेले होते, आणि त्यांच्यामध्ये मोठी जागृती झालेली असली तरी सुद्धा शब्दपटू पण मैदानात अत्यंत भ्याड असलेल्या शिक्षित नेत्यांनी त्यांना धोका दिला आणि ते सुवर्ण युग आणण्याचा दिलासा देत दिवस घालवत राहीले. जळवा इतक्या मूर्खही नव्हत्या. त्या संधीची वाट पहात होत्या. जेव्हा साम्यवादी नेते अशाप्रकारे आपला मूल्यवान वेळ वाया घालवत होते, तेव्हा जळवा सुद्धा योजना बनवत होत्या. युद्धानंतरच्या घटनांना पाहून भांडवलदारांना विश्वास झाला की त्यांच्या स्वार्थांचे रक्षण तेच करू शकतात जे स्वत: श्रमजीवी श्रेणीचे असतील परंतु ज्यांना मनातून भांडवली श्रेणीच्या अस्तित्त्वाची आवश्यकता ठीक वाटत असेल. जर्मनी मध्ये नाझिझमने देशाचा पराभव आणि अपमानाच्या नावावर लोकांना आपल्याकडे ओढणे चालू केले. भांडवलदारांनी हिटलरच्या खाकी वर्दीतील संघटनेकरिता आपल्या थैल्या खुल्या केल्या. नेत्यांच्या विश्वासघाताने पीडीत आणि कर्तव्यविमूढ श्रमजीवी हळूहळू हिटलरच्या चालबाजीला भुलू लागले आणि 1933 पर्यंत हिटलरने आपली शक्ती इतकी मजबूत केली की शासनाचा लगाम त्याच्या हातात आला होता. हिटलरच्या शासनाच्या चार वर्षांमध्ये – 1933 ते 1937 दरम्यान – कामगारांची जीवनशैली जर्मनीमध्ये निम्म्यावर आली होती, आणि भांडवलदार चैनीची बासरी वाजवू लागले होते, तरीही भांडवलशाहीचा नवा अवतार असलेले फॅसिझम आणि नाझिझम हे श्रमजीवी जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणे चांगल्या तऱ्हेने जाणतच होते. हिटलरने जर्मनीच्या स्वाभिमानाला परत मिळवून देण्याचा आणि बृहद जर्मनीच्या निर्माणाचा कार्यक्रम त्यांच्यासमोर ठेवला. फ्रांस आणि इंग्लंडचे भांडवलदार वैयक्तिक स्वार्थ आणि अदूरदर्शितेमुळे श्रमजीवी जनतेला आपल्याकडे तितके खेचू शकत नव्हते, म्हणूनच काळजीपूर्वक एकेक पाऊल टाकत होते. तिकडे जर्मनी भांडवलदारांच्या हिताला नजरेसमोर ठेवून राष्ट्रीय महत्त्वकांक्षेला जबरदस्त दारू पाजत होता. दोन्हीकडे जळवांच्या स्वार्थांचाच प्रश्न होता, आणि दोन्हीकडे जळवा आपल्या स्वार्थांसाठी जबरदस्त तयारी करत होत्या.

तीन वर्षांच्या तयारी नंतर हिटलरने जर्मनीचा स्वाभिमान परत मिळवून देण्याकरिता काहीतरी करू पाहिले. जपान ने मंचुरिया हडपून दाखवून दिले की इंग्लंड, फ्रांस आणि अमेरिकेचे भांडवलदार आपसात असहमत आहेत आणि लढाईला तयार नाहीत. त्याला फ्रांस आणि इंग्लंडचे आपसातील मतभेद माहीत होते आणि हे समजत होते की इंग्लंड फक्त स्वत:ला वाचवू पहात आहे. हे समजूनच 7 मार्च 1936 ला हिटलरने जर्मन फौजांना ऱ्हाईनलँड मधे उतरवले आणि फ्रांस व इंग्लंड तोंड पहात राहीले. दोन वर्षे चार दिवसांनंतर – जेव्हा मुसोलिनी अबेसिनीया मध्ये इंग्लंडला हरवून चुकला होता – 11 मार्च 1938 रोजी हिटलरने ऑस्ट्रियावर कब्जा केला. बाहेरच्या जळवांचा जळफळाट झाला. परंतु जर्मनीच्या जळवांची तहान एवढ्याने भागणार नव्हती अणि ना जर्मन जनतेला अनंत काळापर्यंत लोणी सोडून बटाटे खायला तयार ठेवले जाऊ शकत होते. जनतेला बटाटे खाण्यास तयार ठेवण्यासाठी हिटलरला अजून न जाणे किती कांड करावे लागतील. 1 ऑक्टोबर 1938 ला हिटलरने झेकोस्लोवाकिया कडून सुडटनलँड हिसकावले आणि 15 मार्च 1938 ला सर्व झेकोस्लोवाकियाला अधिनता स्विकारण्यास बाध्य केले. जगभरातील जळवा पुढच्या युद्धाची जबरदस्त तयारी करून चुकल्या आहेत. पुढील युद्धातील नरसंहारापुढे मागील महायुद्ध फिकेच पडेल. जर्मनीकडे आता आठ कोटी लोक जळवांसाठी नव्या बाजाराकरिता रक्त वहावायला तयार आहेत, आणि तिने हवाई, सागरी आणि जमिनी युद्धाकरिता भयंकर शस्त्रास्त्रे बनवली आहेत. आता तिच्या विमानांच्या एका चढाईत पाऊण कोटी लोकसंख्येचे लंडन निर्जन होऊ शकते. लढाईत मरणारे आता फक्त सैनिक नसतील, तर मरणाऱ्यांमध्ये मोठी संख्या निरपराध नागरिकांची सुद्धा असेल. आबाल-वृध्दांची कोणी पर्वा करणार नाही. सर्व जळवा मोठ्या हिरीरिने जगात प्रलय आणण्याची तयारी करत आहेत. ज्या वेळी मनुष्य जातीने आपल्यातील पहिला परजीवी पैदा केला होता, त्यावेळी त्यांना काय माहित होते की जळवा वाढत जाऊन आज हा दिवस दाखवतील. यांच्या विनाशाशिवाय जगाचे कल्याण नाही! जळवांनो, तुमचा ऱ्हास होवो!

अनुवाद : अभिजित

# भांडवलदारांच्या हिताकरिता लक्षद्वीप बेटांवर भाजपचे जातीय राजकारण!

पान 8 वरून

प्रामाणिक चाकराने असे तमाम निर्णय आणि धोरणे राबवत, जे गेल्या सात वर्षात भाजपच्या केंद्रीय सरकारने देशात सर्वत्र लोकशाहीचा गळा घोटण्याचे, धार्मिक जातीय आणि अल्पसंख्याकांवरच्या अत्याचारांचे, हिंदुत्व रेटण्याचे, भांडवलदारांच्या हितासाठी कोणत्याही स्थराला जाण्याचे आणि निरंकुश एक हाती सत्ता गाजवण्याचे प्रकरण चालवले होते तेच प्रकरण लक्षद्वीप मध्ये पुढे रेटलंय. त्यातही आता प्रफुल्ल खोडा पटेल हे नाव लक्षद्वीप मध्ये इतकं अलोकप्रिय झालेलं आहे की तिथली जनता एका सुरात प्रफुल्ल पटेल ची तात्काळ हकालपट्टी करण्याची, त्याला प्रशासक या पदावरून काढून टाकण्याची मागणी करत आहे.

देशभरामध्ये नोटबंदी, जी.एस.टी., कोव्हिडचे गलथान व्यवस्थापन, वाढती महागाई, प्रचंड बेरोजगारी, लोकशाही-नागरी हक्कांचे दमन, जनांदोलनांचे दमन असे

# तुमच्या जळवांचा ऱ्हास

✍ राहुल सांकृत्यायन

जळवा? – ज्या आपल्या पोषणाकरिता धरतीवर कष्टाचा आधार घेत नाहीत. त्या दुसऱ्यांनी कमावलेल्या रक्तावर गुजराण करतात. मानवी जळवा या पशूजगतातील जळवांपेक्षा जास्त भयंकर असतात. यांनी मानवी जीवनाला किती हीन आणि संकटग्रस्त बनवले आहे याचा उल्लेख थोडे अगोदर झाला होता आणि पुढेही करू. या जळवांची उत्पत्ती कशी झाली? सुरुवातीचा मनुष्य असभ्य होता, तो जंगलात रहायचा. परंतु आपली जीविका तो पृथ्वीवर शोधायचा. तो शिकार करायचा. तो जंगलामध्ये फळे तोडत असे, परंतु दुसऱ्याची कमाई, दुसऱ्याच्या रक्ताला शोषून गुजराण करणे त्याला पसंद नव्हते. स्वरक्षणासाठी तो आपला नेताही निवडी. समाजाचे साधारण संघटनही करत असे. परंतु शोषण करणाऱ्यांसाठी तिथे स्थान नव्हते. शिकारी अवस्थेतून मनुष्य पशुपालक अवस्थेत आला. अजूनही त्याचे नायक आणि शासक स्वत:च आपल्या मेंढ्या आणि गाई राखत. हो, आता कधी-कधी एखादी मेंढी-गाय त्यांच्यापर्यंत पोहोचू लागली आणि अशाप्रकारे खूप हलक्या रूपात मानवी जळवांचा आविर्भाव झाला. कृषक अवस्थेला पोहोचल्यावर नेते आणि शासकांचा प्रभाव अजून वाढला. त्यांनी राजाचे रूप धारण करणे सुरू केले. अर्थात, सुरुवातीला समाजाच्या स्वरक्षणासाठी शस्त्रांच्या आणि शासनाच्या सुव्यवस्थेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली गेली होती आणि त्यांचे पद तोपर्यंत सुरक्षित होते जोपर्यंत ते कामांच्या संचालनाची योग्यता बाळगत. योग्यतेवरून निवडलेला राजा भेटवस्तू आणि कराच्या रूपाने अधिक धन एकत्र करण्यात यशस्वी झाला आणि अशाप्रकारे योग्यतेपेक्षा जास्त धनाची शक्ती त्याच्या हातात आली. आता एकीकडे तो आपल्या शासक आणि नेता होण्याद्वारे लोकांवर प्रभाव टाकत असे, तर दुसरीकडे धनाचे प्रलोभन देऊनही लोकांना आपल्याकडे खेचू शकत असे. अशाप्रकारे तो एकीकडे अनेक अत्याचार करण्याचे साहस करू शकत असे, तर दुसरीकडे हा प्रयत्नही करू लागला की त्याच्यानंतर त्याचे स्थान त्याच्या मुलाला मिळावे. शतकांच्या प्रयत्नांनंतर योग्यतेचे कारण रसातळाला गेलेच आणि राजाचा ज्येष्ठ मुलगा राजा बनू लागला. सगळ्या राजघराण्याचा खर्च दुसऱ्यांवर लादला जाऊ लागला. या जळवांनी फक्त आपले संगोपनच दुसऱ्यांच्या कमाईवरून चालू ठेवले नाही, तर धरतीपासून धन पिकवू शकणाऱ्या कितीतरींना आपले नोकर-चाकर बनवून समाजाला त्यांच्या श्रमापासूनही वंचित ठेवले. खानदानी राजे तोपर्यंत अशाप्रकारचे शोषण, नाकर्तेपणा, आणि आपल्या वासना-पूर्तीसाठी विविध प्रकारची घाणेरडी कृत्ये करत राहत जोपर्यंत जनतेला त्रस्त होताना पाहून एखादा सेनापती वा मंत्री राजाचा वध करून नवीन राजवंशाची पायाभरणी करत नसे. जेव्हापासून राजा अधिक संपत्तीचा मालक आणि गैर-उत्तरदायी बनू लागला, तेव्हापासून 'जसा राजा, तशी प्रजा" चे अनुकरण करत कितीतरी लोक स्वत:च जळवा बनून आरामात सुख आणि चैनीचे जीवन जगू जागले. राजा सुद्धा प्रलोभने देऊन त्यांना याकरिता प्रोत्साहित करत होते. धरतीपासून धन पैदा करणाऱ्यांचे स्थान समाजात खूप खालावले होते आणि राजा, राजकुमार, पुरोहित, मंत्री, सामंतच नाहीत तर त्यांचे नोकर सुद्धा धन पैदा करणाऱ्यांपेक्षा जास्त सन्माननीय समजले जात. शारीरिक श्रमाला अत्यंत खालच्या नजरेने पाहिले जाई. आता जळवांची अजून एक श्रेणी पैदा झाली जी कारागीर आणि शेतकऱ्यांद्वारे उत्पादित वस्तूंच्या खरेदी-विक्रीचे काम करत होती. या



सामान्य बनियांनी जास्त लाभासोबतच आपल्या कामालाही पसरवले आणि सुव्यवस्थित केले. त्यांचे मोठमोठे तांडे देशाच्या एका कोपऱ्यातील वस्तू दुसऱ्या कोपऱ्यात पोहोचवत आणि भरभक्कम नफा कमावत. राजा, राजकुमारांच्या नंतर आपल्या सेवेच्या बदल्यात ज्या मंत्र्यांना आणि सेनापतींना मोठमोठ्या जागिरी मिळत, त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान होते आणि त्यांच्या नंतर बनियांचा नंबर येई. समाजात जुना विचार अजूनही कधीकधी दिसून येई, ज्यात शेतकऱ्याच्या कमाईला सर्वात शुभ कमाई समजले जायचे आणि राजाची चाकरी आणि व्यापाराला खालच्या श्रेणीतील कमाई मानले जायचे, परंतु जगातील सुख आणि वैभव तर त्याच्यासाठीच आहेत ज्याच्याकडे धन आहे, मग ते धन कसेही मिळवलेले असो. राजकार्य आणि व्यापार तर सोडाच, व्याजाचा लाभ – ज्याला की पापाचे धन अजूनही समजले जाते – त्यालाही कोणी सोडण्यास तयार नसे. सामंत दास आणि अर्ध-दास शेतकऱ्यांच्या पलटणींकडून शेती करवत आणि कारागिरांना वेठबिगारी करवून त्यांच्याकडून वस्तू तयार करवत. व्यापारी फक्त स्थल मार्गाने आणि जलमार्गाने व्यापार करत नसत, तर कधीकधी काही कारागिरांना जमा करून त्यांच्याकडून व्यापाराच्या अनेक गोष्टी बनवत. विना मेहनतीची कमाई आता सर्वाधिक सन्मानाची कमाई झाली होती. आणि का न व्हावी, जेव्हा हजारो वर्षांपासून पुरोहित लोक स्वत: या लुटीच्या नफ्यावर मौज करत आले होते. त्यांच्याच हातात चांगले-वाईट ठरवण्याची व्यवस्था होती.

वाढता-वाढता स्थिती आता इथवर पोहोचल्यावर असे मानले जाऊ लागले की राजा त्याच्या जुन्या तपस्येचा उपभोग घेण्यासाठी किंवा ईश्वराच्या(खुदाच्या) प्रसादाचा उपभोग घेण्यासाठी धरतीवर आला आहे, आणि खूप झाले तर राजवंशाच्या संस्थापक पहिल्या व्यक्तींनी आपल्या काही योग्यतांना सिद्ध केले आणि त्यांचे उत्तराधिकारी – मग ते योग्य असोत वा अयोग्य, फक्त भोगविलासाकरिता सिंहासनावर बसत असत. फुकटचा भोग-विलास पाहून कोणाच्या तोंडाला पाणी सुटणार नाही? आणि त्याकरिता जेव्हा राजे आपसात लढू लागत, तेव्हा योग्य सेनानायकांचे महत्त्व वाढणे गरजेचे होते. मग त्यांच्या जहागिरी वाढल्या आणि स्थिती इथवर पोहोचली की राजा खुद्द सामंतांच्या हातातले बाहुले बनला.

शिकार आणि शेतीसोबतच पहिल्या जळवांचा जन्म होतो. राजेशाहीच्या युगात त्यांची संख्या थोडी वाढते आणि राजकुमार, राजकर्मचारी, व्यापारी आणि त्यांचे सेवक जळवांच्या श्रेणी मध्ये सामील होऊन संख्या अजून वाढवतात. जेव्हा राजा सामंतांच्या हातातील बाहुली बनतो, तेव्हा सामंतांच्या स्वेच्छाचारितेची पाठराखण करणे आपले कर्तव्य समजू लागतो – अशा सामंतशाहीच्या युगात जळवांची संख्या अनेक पटींनी वाढते. या युगाचा अंत होते वेळी युरोपातील बनियांना आपला प्रभाव वाढवण्याची नवी संधी मिळते. "वाणिज्ये वसते लक्ष्मी:" ही म्हण तर प्रसिद्धच आहे. इंग्लंडचे व्यापारी सुद्धा पोर्तुगाल, स्पेन इत्यादींच्या स्पर्धेत दुनियेतील दूरदूरच्या देशांमध्ये व्यापार करू लागले. इंग्लंडमध्ये त्यांच्याकडे अपार संपत्ती जमा होऊ लागली. युरोपातील विविध देशांमध्ये व्यापाराच्या संबंधात स्पर्धा वाढू लागली, तरीही पृथ्वीचा मोठा भाग अस्पर्शित होता आणि सर्व साहसी लोकांसाठी कुठे ना कुठे कामाची जागा शिल्लक होती. अठराव्या शतकाच्या शेवटापर्यंत युरोपातील व्यापारात इंग्रजांनी अग्रणी स्थान मिळवले होते. त्यांच्याकडे दुनियेतील सर्वात मोठे बाजार होते. त्यांच्या मालाने भरलेली जहाजं इंग्लंडमधून बाजारांकडे आणि बाजारांकडून इंग्लंडकडे सहा-सहा महिने प्रवास करून पोहोचत असत. त्या काळातील लाकडाच्या जहाजांमधून – ज्यांना शीडं आणि सुकाणूच्या मदतीने एका जागेहून दुसऱ्या जागी नेले जाई – प्रवास फारच धोक्याचा होता. पण प्रचंड नफ्यापुढे संकटं काय चीज होती? व्यापाऱ्यांची सर्वात मोठी चिंता होती की जास्तीत जास्त प्रमाणात माल कसा तयार होईल? याच काळात इंग्लंडमध्ये इंजिनाचा आविष्कार झाला. वाफेने चालणारी यंत्र जास्त प्रमाणात आणि जास्त वेगाने माल तयार करू लागली. इंजिनांना रेल्वे आणि जहाजांवर लावल्यावर मोठमोठ्या यात्रा अजूनच छोट्या झाल्या आणि धोके व अवलंबित्व सुद्धा कमी होत गेले.

यंत्रांच्या शोधामुळे, त्यांच्याद्वारे बनवल्या गेलेल्या वस्तूंच्या तुलनेत हाताने बनवलेल्या वस्तू महाग होऊ लागल्या आणि हातांचे कारागिर बेरोजगार होऊ लागले. बेरोजगारीने चिडलेल्या कारागिरांनी कितीतरी कारखान्यांना तोडले, जागोजागी बंड झाले. पण आता व्यापाऱ्यांची शक्ती साधारण राहिलेली नव्हती. संपत्तीमुळे राजदरबारांमध्ये त्यांचा प्रभाव आणि सन्मान सामंतांसारखा होऊ लागला होता आणि धनबळावर आता ते शासन तंत्रावर अधिकार सांगू लागले होते. ज्या यंत्रचलित कारखानदारामागे-भांडवलदारामागे राज्यशक्ती होती, त्यांच्याशी काय कारागिर लढू शकले असते? हळूहळू त्यांचे बंड तर थंड पडत गेले, ज्यामागे दमनाशिवाय एक हे सुद्धा कारण होते की यांत्रिक कारखाने मुख्यत: इंग्लंडमध्येच स्थापित झालेले होते आणि इंग्लंडकडे साऱ्या दुनियेचा बाजार होता. यामुळे तिथले भांडवलदार सर्व कारागिरांना बेरोजगार न करता त्यांना नवनवीन कारखान्यांमध्ये कामाला लावत. जसजसा व्यापार वाढत गेला, तसतशी भांडवलदारांकडे अपार संपत्ती एकत्र होत गेली. तेथील राज्यकारभार सुद्धा भांडवलदारांच्या हातात गेला आणि राजेशाही वा सामंतशाही सरकारांच्या जागी भांडवली सरकारे स्थापित झाली. त्यांचे पवित्र कर्तव्य होते भांडवलदारांच्या स्वार्थांचे रक्षण करणे.

या नव्या आर्थिक व्यवस्थेमुळे दुनियेत विविध प्रकारच्या उलथापालथी होऊ लागल्या. देशातील श्रमिक भांडवलदारांचे अर्धदास (पैशाचे गुलाम) बनू लागले. ज्या देशांवर भांडवलदारांचे शासन होते, तेथे सुद्धा त्याच स्वार्थाला समोर ठेवून काम करवले जाऊ लागले. इंग्लंडमध्ये सामंतशाहीची

पान 12 वर

### लेखकाचा परिचय

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरूद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरूंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं साचलेपणा. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रूढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# शिक्षण अधिकारावर ऑनलाईन शिक्षणाचा हल्ला!

पान 16 वरून

कधी सुरू होणार? काश्मिर बोर्डाच्या परीक्षेत पहिल्या 10त आलेला एजाज मागील 2 वर्षात एकही तास करू शकला नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची आवड असणारी 11 वीत असलेली पलाला म्हणते की 21 व्या शकतात असूनही आम्ही भूतकाळात जगत आहोत. सध्या ज्या विद्यार्थ्यांकडे (ज्यांचं प्रमाण अत्यल्प आहे) मोबाईल, लॅपटॉप आहेत त्यांच्यामते त्यांच्यासाठी ऑनलाईन शिक्षण एका काल्पनिक कथेपलीकडे काही नाही! सध्या तिथे मर्यादित लोकांपुरताच असणारे 2जी इंटरनेट चा वेग हा गोगलगायी प्रमाणे आहे. ना शिक्षकांना तास घेता येत ना विद्यार्थ्यांना तासाला बसता येत! कुलगाम येथील सरकारी महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक असलेले सांगतात की 15 मिनिटांच लेक्चर इंटरनेट वर टाकायला 5 दिवस लागतात! एकंदरीत काश्मिरी विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण सुद्धा घेणे शक्य नाही. 2 वर्षांहून अधिक काळ इतर जगाशी संपर्क तुटलेले हे विद्यार्थी आत्मविश्वास गमावू लागले आहेत. भांडवली व्यवस्थेत स्पर्धेत टिकणे महत्वाचे असते आणि ह्याच स्पर्धेतून बाहेर फेकल्या गेल्याची जाणीव काश्मिरी विद्यार्थ्यांना त्रस्त करत आहे. मोदी सरकारने काश्मिरी जनतेवर निर्बंध लादल्यानंतर ज्या अत्यल्प बातम्या बाहेर येऊ शकला त्यातून हे तर स्पष्ट आहे की मागील 2 वर्षात काश्मिर मधील आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था पूर्णतः कोलमडून पडली आहे. भारतीय राज्यसत्तेने काश्मिरी जनतेसोबत ऐतिहासिक रित्या केलेला विश्वासघात आज तिथल्या विद्यार्थ्यांचं, येणाऱ्या पिढ्यांच्या भवितव्याला काळोख्या कोठडीत डांबत आहे.

### विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या

कोरोनाकाळातील ढासळलेली आर्थिक परिस्थिती, अनियोजित ऑनलाईन शिक्षण प्रणाली यांचा विद्यार्थ्यांवर झालेला सर्वाधिक भयंकर परिणाम म्हणजे देशभरात कामगार कष्टकरी, गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या! किंबहुना सरकार आणि भांडवली शासन प्रणालीने थंड डोक्याने केलेले खून! विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत भारत तसाही जगभरातील देशांमध्ये सर्वात पुढेच राहिला आहे. कोरोनाकाळात ह्या आत्महत्यांच्या प्रमाणात 30% नी वाढ झाली आहे. 2 जून रोजी केरळ मध्ये दहावीत उत्तम गुण मिळालेल्या एका 15 वर्षीय कामगार कुटुंबातील मुलीने आत्महत्या केली कारण मोलमजुरी करणाऱ्या वडिलांना गेल्या काही महिन्यांपासून काहीच काम मिळत नव्हतं, ज्यामुळे ऑनलाईन तासाला बसण्यासाठी लागणार आवश्यक खर्च नसल्याने ती तासांना बसू शकली नाही.

कोरोनाकाळात केरळमध्ये 10-18 वयोगटातील 173 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. दिल्लीतील लेडी श्रीराम कॉलेज मधील 19 वर्षीय ऐश्वर्या रेड्डी, बंगाल मधील 16 वर्षीय विद्या, आसाम मधील 16 वर्षीय चिराग, महाराष्ट्रातील साताऱ्यातील 15 वर्षीय साक्षी, गोवा, तेलंगणा, मध्यप्रदेश, पंजाब, त्रिपुरा, कर्नाटक येथील विद्यार्थी ह्या सर्वांजवळ केंद्र आणि राज्य सरकारांनी आत्महत्येशिवाय कुठलाही पर्याय शिल्लक ठेवला नाही! ही सर्व मुलं कामगार-कष्टकरी, गरीब कुटुंबातली होती. प्रत्येकाच्या आत्महत्यामागे मुख्यत्वे ऑनलाईन शिक्षणासाठी इंटरनेट, मोबाईल नसणं, फीज साठी पैसे नसणं हेच होतं! भांडवली स्पर्धेचं जग आधीच मुलांना लहानपणापासून तणावपूर्ण वातावरण देतं आणि त्या स्पर्धेत टिकण्याची सर्वस्वी जबाबदारी देखील त्यांच्यावरच सोपवली जाते! ज्या ठिकाणी देशातल्या बजेटचा सर्वाधिक हिस्सा हा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च व्हायला पाहिजे त्याच्या अगदी उलट सर्वात कमी खर्च शिक्षणावर आणि आरोग्यावर भारतात केला जातो. अंबानी, टाटा, बजाज सारख्यांना करोडोने करमाफी दिली जाते, विजय माल्ल्या, मेहुल चौकसी सारख्यानी बुडवलेल्या करोडोंच्या कर्जाचा बोजा देशातील सामान्य जनतेवर टाकला जातो परंतु देशातील विद्यार्थ्यांना मात्र शिक्षणाच्या समान, दर्जेदार संधी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत! निवडणुकांमध्ये भांडवली निवडणूकबाज पक्षांच्या ज्या नेत्यांना निवडून दिले जाते त्यांच्या स्वतःच्या मोठमोठाल्या खाजगी शैक्षणिक संस्था असतात. त्यामुळे स्पष्ट आहे की ते सरकारी शिक्षण संस्थेच्या दर्जा आणि समानता यासाठी का काम करतील? 2036 मध्ये ऑलिम्पिक स्पर्धा भारतात आयोजित करण्याचं प्रधानमंत्री मोदींच स्वप्न नुकतंच गोदी मीडियाने जाहीर केलं. हे स्वप्न पाहणाऱ्या प्रधानमंत्र्याला देशातील करोडो विद्यार्थ्यांच्या जीवनाची तिळमात्रही आस्था नसावी ही घृणास्पद गोष्ट आहे! संसाधनाअभावी देशात शेकडो विद्यार्थ्यांना आत्महत्या करावी लागते ही अतिशय भयंकर आहे. त्यामुळेच ह्या केवळ आत्महत्या नसून व्यवस्थेने आणि सरकारने केलेले खून आहेत

शिक्षण हा सर्वांचा मूलभूत अधिकार आहे, त्यासाठी संघर्ष करून तो मिळवणे आज कामगार-कष्टकरी जनतेसाठी अनिवार्य आहे. के.जी. टू पी.जी. शिक्षण हे सरकार मार्फत मोफत आणि समान दर्जाचं असायलाच हवं! शिक्षणा सोबतच रोजगाराच्या अधिकारासाठी लढून तो मिळवणं हाच ह्या वाढत्या आत्महत्यांवरचा आणि विद्यार्थ्यांवरील अन्याय रोखण्याचा एकमेव मार्ग आहे.

## कविता: चेटकिणी

✎कविता कृष्णपल्लवी
भाषांतर: गणेश विसपुते

चेटकिणी खूप हसतात
निलाजऱ्या आणि जिद्दी असतात
अत्यंत बडबड्या असतात अन् प्रत्येक मुद्यावर
वाद घालत राहतात न थकता.
चेटकिणी आपल्या आयुष्याचा प्रत्येक निर्णय स्वतःच घेतात.
आणि म्हणूनच अतिशय भयावह असतात.
लोकांना खातरी असते की सगळ्या स्त्रियांना
त्या बिघडवू शकतात आणि या जगाचा नरक बनवू शकतात.
बुद्धिवाद्यांप्रमाणे
चेटकिणी तडजोडी करत नाहीत,
आणि कोणत्याही शांतीप्रिय सद्गृहस्थांप्रमाणे
कोणतीही किंमत देऊन शांतता विकत घेण्याचा प्रयत्नही.
काळाप्रमाणे चालणं आणि स्वतःला तसं ढाळण्याचा
कोणताही प्रयत्न त्या करत नाहीत.
चेटकिणी प्रतिवाद करतात, प्रश्न विचारत राहतात,
मतभेद दाखवतात, पलटवार करतात.
चेटकिणी दिवसाउजेडी जगातल्या सगळ्या
स्त्रियांमध्ये मिसळून गेलेल्या असतात
पण सहसा त्यांच्या सवयीनं ओळखल्या जातातच.
कित्येकदा एखाद्या पुरुषाला अचानक लक्षात येतं
की त्याची पत्नी किंवा मुलगी एक चेटकिण बनलेली आहे.
मग दुनियेतले तमाम मांत्रिक अघोरी तांत्रिक त्यांना
अनेक प्रकारे बांधून, समजावून पाहतात आणि
हारून मग तऱ्हेतऱ्हेच्या शिक्षा देतात.
सहसा त्यांना दूर देशी निर्वासित केलं जातं
पण त्या नेहमी परत येतात आणि न थांबता
पुन्हा आपली कामं करू लागतात.
त्या उद्विग्न अन् अशांत आत्मे असतात
चराचराच्या कोपऱ्या-कोपऱ्यांत भटकणारे.
त्या असतात शापित यक्षकन्या
ज्यांनी क्षमायाचना करण्याचा वा देवलोकी जाण्यासाठीच्या
परवान्यासाठी अर्ज केल्याचा कुठलाही इतिहास सापडत नाही.
चेटकिणींच्या दुःखांच्या कहाण्या विरळच दिसतात
अमावस्येच्या रात्री स्मशानातल्या नीरव एकांतात
चेटकिणी कुठल्याशा ऐतिहासिक वेदनेनं
रडतात रक्ताची आसवं गाळत
आणि कवींसाठी मिथकीय रहस्यं
निर्माण करतात
चेटकिणी तिरस्कृत वटवाघळांशी बोलतात
आणि रात्रभर भणभणत
त्यांच्यासह आकाशात सूर मारत उडत राहतात
त्या छमछम पैंजणं वाजवत
त्यांच्या उलट्या पावलांसह नाचत
दाट ओलसर रानांतल्या
तलावापर्यंत जातात न्हायला
आणि पुन्हा नजीकच्या पिंपळावर चढून
त्याच्या सगळ्यात उंच फांदीवरून
तमाम स्त्रियांच्या उदास झोपेत आणि स्वप्नांमध्ये
दृष्णदिशी उडी मारतात.

(फेसबुकवरून साभार)




## उद्धरण

**"जर देशप्रेमाची व्याख्या सरकारची अंधभक्ती नसेल, झेंड्यांची आणि राष्ट्रगीताची भक्तिभावाने पूजा करणे नसेल; उलट आपल्या देशावर, आपल्या साथी नागरिकांवर (सर्व दुनियेतील) प्रेम करणे असेल, न्याय आणि लोकशाहीच्या तत्त्वांप्रती वचनबद्धता असेल; तर खऱ्या देशप्रेमासाठी हे आवश्यक आहे की जेव्हा आपले सरकार या तत्त्वांचा भंग करेल, तेव्हा आपण त्या सरकारचा आदेश मानणे बंद करू!"**

**- हावर्ड झिन**

**(प्रसिद्ध अमेरिकी इतिहासकार )**



# 23 जुलै, चंद्रशेखर आझाद यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने


## चंद्रशेखर आझादांची शहादत सतत प्रेरणा देत राहील!

✎ नेहा

शहादत थी हमारी इसलिये कि
आज़ादियों का बढ़ता हुआ सफ़ीना
रुके न एक पल को
मगर ये क्या? ये अँधेरा
ये कारवाँ रुका क्यों है?
चले चलो कि अभी काफ़िला-ए-इंकलाब को
आगे, बहुत आगे जाना है।

चंद्रशेखर आझाद यांच्या बलिदानाला 115 वर्ष पूर्ण झाली. तरीही आजपर्यंत त्यांचा विसर कुणाला पडलेला नाही. त्यांच्या अलोट धैर्याने आणि त्यागाने देशात जे चैतन्य निर्माण केले, ते आजच्या तरुण पिढीला क्रांतिकारी स्फूर्ती देत आहे. चन्द्रशेखर आझाद यांनी कामगारांचे , गरिबांचे जीवन खूप जवळून बघितले होते. स्वातंत्र्यानंतर कामगार वर्गाच्या राज्याची स्थापना व्हावी असे त्यांचे स्वप्न होते. महान युवा क्रांतिकारक आणि हिन्दुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन एसोसिएशन चे कमाण्डर चन्द्रशेखर आझाद यांचे जीवन शोषण, अन्याय, अत्याचारावर आधारित व्यवस्थेमध्ये जीवन जगत असलेल्या युवकांना प्रेरणेचा स्रोत आहे, ज्यांना या व्यवस्थेत गुदमरल्यासारखे वाटते आणि विशेषत: कामगार-कष्टकरी वर्गातून आलेल्या तरुण मुला-मुलींसाठी ज्यांच्यासाठी क्रांती ही एकच आशा उरली आहे, त्यांच्यासाठी चंद्रशेखर आझादचे व्यक्तिमत्त्व मार्ग दाखविण्याकरिता मशालसारखे आहे.

आझाद यांचा जन्म 23 जुलै, 1906 रोजी मध्यप्रदेश जिल्ह्यातील भाबरा गावात झाला, एका गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची संधीही मिळाली नव्हती. या बाबींमध्ये ते हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मी (एच.आर.ए.) आणि हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन (एच.एस.आर.ए.) च्या इतर क्रांतिकारकांपेक्षा भिन्न होते, जे बहुतेक मध्यमवर्गामधून आलेले सुशिक्षित युवक होते. आझाद हे एच.आर.ए. आणि एच.एस.आर.ए. यांच्यामधील सर्वात कळीचे व्यक्ती होते आणि काकोरी प्रकरणानंतर आझाद यांनी क्रांतिकारक संघटनेमध्ये विखुरलेल्या सूत्रांना जोडून ठेवण्यात व संघटनेला एकसंध करण्यात नेतृत्वाची भूमिका बजावली होती. हे काम अत्यंत खडतर होते. चंद्रशेखर आझाद अतिशय लढाऊ वृत्तीचे व्यक्ती होते, परंतु स्वभावाने अतिशय शांत व संयमी होते. विशेषतः ज्या ज्या वेळी सशस्त्र उठावाची कामगिरी त्यांच्याकडे असे त्या त्या वेळी ते अत्यंत शांत व संयमीपणे वागायचे. आपल्या ध्येयाच्या बाबतीत अतिशय निर्भयी होते. चळवळीच्या धकाधकीतून मिळणाऱ्या थोड्याफार वेळात ते राजकीय अभ्यास करत असत. त्यांना इंग्रजी चांगले वाचता येत नसे. त्यामुळे इंग्रजीतील समाजवादी साहित्य व वैचारिक साहित्य ते इतर साथीदारांकडून वाचून घेऊन नीट समजावून घेत असत. इ.स.1921 मध्ये महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनात तेव्हाच्या 15 वर्षे वयाच्या चंद्रशेखरने सहभाग घेतला होता. त्यासाठी त्यांना अटक झाली होती. तेव्हा न्यायालयात चंद्रशेखरने आपले आडनाव 'आझाद' असल्याचे नोंदवले. तेव्हापासून ते त्याच आडनावाने ओळखले जाऊ लागले. 1925 साली काकोरी येथे दहशवाद्यांनी रेल्वेवर केलेल्या हल्ल्यात चंद्रशेखर आझादांनी भाग घेतला होता. 1920-30 च्या दरम्यान दहशतवादी चळवळीकडे खेचले गेलेले तरुण क्रांतिकारक जनतेचे स्फूर्तीस्थान बनले होते. तरुणांतले प्रामुख्याने नजरेसमोर येणारे एक नाव म्हणजे चंद्रशेखर आझाद. पंजाब , उत्तर प्रदेश , बिहार या प्रांतात त्याचे कार्यक्षेत्र होते. त्यामुळे चंद्रशेखर आझादांचे नाव कानावर आले तर या प्रांतातील पोलिस अधिकारी अक्षरशः चळाचळा कापू लागायचे.



सन 1931 भारताच्या क्रांतिकारी आंदोलनासाठी व देशातील कष्टकरी जनतेसाठी सर्वात घातक ठरलं! आयुष्यभर अंगीकारलेल्या सशस्त्र लढ्याच्या मार्गावर लढत लढतच 27 फेब्रुवारी 1931 रोजी इंग्रजांशी लढतांना आझाद शहीद झाले आणि 23 मार्च 1931 लाच भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना इंग्रज सरकारने फाशी देऊन भांडवलशाही-साम्राज्यशाही व प्रत्येक प्रकारच्या शोषणाविरुद्ध लढणाऱ्या खऱ्या योद्धांना आपल्या मार्गातून हटविले. या क्रांतिकारकांच्या बलिदानानंतर कामगार कष्टकऱ्यांची सत्तेची आशा धूसर झाली, परंतु संपली नाही. कारण ह्या व्यक्तींना मारून सुद्धा ते त्यांच्या विचारांना संपवू शकले नाहीत.

चंद्रशेखर आझाद यांचा जन्म कमालीची गरिबी, अशिक्षितता, धार्मिक कट्टरतेच्या वातावरणात झाला. ते फक्त पुस्तकं वाचून नाहीत तर राजकीय संघर्ष व जीवन संघर्षातील आपल्या सक्रिय अनुभवातून शिकून त्या क्रांतिकारी दलाचे नेते झाले ज्या दलाचं उद्देश्य फक्त इंग्रजांना घालवणं नव्हतं तर एक शोषणविरहित आणि समतामूलक समाजाची स्थापना करणं होतं. कामगारांच्या सत्तेशिवाय आणि शोषणाच्या प्रत्येक रूपाचा विनाश केल्याशिवाय, देशातील कष्टकरी जनतेची मुक्ती शक्य नाही हे सत्य ते जाणून होते. जोपर्यंत आपल्या देशातील जनता देशी - विदेशी भांडवलदारांच्या नफ्यासाठी आपल्या हाडामासाचा, रक्ताचा एक एक थेंब वाहायला मजबूर आहे, जोपर्यंत शिक्षण, आरोग्य, रोजगार, उत्तम आवास, उत्तम भोजन यांपासून एकही कामगार वंचित आहे, जोपर्यंत भूक आणि कुपोषणाचा भस्मासुर आमच्या बालकांना गिळत राहील तोपर्यंत आमच्या क्रांतिकारकांचे स्वप्न आमच्या स्मरणात राहील. ज्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी त्यांना आपल्या प्राणांची देखील आहुती द्यावी लागली ते स्वप्न आम्ही जिवंत ठेवू.

साथींनो, आजचा काळ हातावर हात धरून आणि स्वतःच्या नशिबावर विश्वास ठेवून बसण्याचा नाही. कुणी तारणहार किंवा पैगंबर येऊन आपल्याला मुक्ती मिळवून देईल असेही नाही. आपणच आपली ताकद ओळखायला हवी. चंद्रशेखर आझादांसारखे क्रांतिकारक देखील कोणी अवतार पुरुष नव्हते, ते सुद्धा तुमच्या आमच्या सारखे मानवंच होते. त्यांनीसुद्धा मुंबईत मजुरी करण्यापासून कितीतरी रात्री रस्त्यावर व फूटपाथवर व्यतीत केल्या होत्या. परंतु त्यांनी जीवनाच्या त्या संकटांपुढे गुडघे न टेकता जीवनाला अधिक सुंदर आणि अर्थपूर्ण बनविण्याचं जे स्वप्न बघितलं, जो संकल्प केला त्यास पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न शेवटच्या श्वासापर्यंत करत राहिले. आपण कष्टकऱ्यांनी ज्या हातांनी या भांडवली जगाच्या इमल्यांना उभं केलं, ज्यावर भांडवलदार मिरवतात, त्याच हातांनी आता आपल्या शोषणमुक्त समतामूलक भविष्याला रचावं लागेल. नव्या जोमानं क्रांतिकारी आंदोलनाची सुरुवात करावी लागेल. इतिहासातील चुकांपासून धडा घेत, क्रांतिकारी संघटनेचा पाया रचावा लागेल. आपल्याला पुन्हा एकदा नव्या ऊर्जेनं आणि नव्या आवेगानं आपल्या मुक्तीस्वप्नांना देशाच्या कानाकोपऱ्यात पसरवावं लागेल. शासक वर्गाच्या आपल्याला जाती धर्मात विभागण्याच्या षडयंत्राविरुद्ध आपल्याला सर्व जाती-धर्मातील कष्टकऱ्यांची वर्गीय एकजूट बनवावी लागेल. तेंव्हाच आपण आपल्या शहिदांच्या वास्तविक स्वप्नांना पूर्ण करू शकू.

# अस्मितावादी राजकारण नाकारत, रोजगार अधिकाराचे आंदोलन उभे करा!

पान 4 वरून

मजुरीच्या रूपात त्यांना दिला जातो, आणि उरलेला मालकांच्या खिशात जातो—नफ्याच्या रूपाने. कामगारच आपली मजुरी सुद्धा पैदा करतात आणि मालकाचा नफा सुद्धा. जितके कमी कामगार, जितका जास्त वेळ काम, तितका जास्त नफा. तेव्हा उत्पादन साधनांवर खाजगी मालकी असलेल्या भांडवली व्यवस्थेत रोजगार निर्माण करणे हे उद्दिष्ट नाहीच.

बेरोजगारीबद्दलच्या कारणांचे **श्रमही फार. मशिनींमुळे** रोजगार जातात हा श्रम आहे. असलेल्या श्रमिकांचे श्रम कमी न करता श्रमिकच कमी करणे हे काम मशीन नाही तर मालक करतात, कारण त्यातूनच नफा वाढतो. खरेतर आज श्रमाची उत्पादकता प्रचंड वाढलेली असताना, **8 ऐवजी 6 तास जरी काम केले** तरी भांडवलदार वर्गाला नफा होऊ शकतो! मशिनीकरणासोबत अनेकदा नोकऱ्या जाताना दिसतात, परंतु भांडवलाचे विस्तारित पुनरुत्पादन होत असताना, म्हणजे संचित भांडवल गुंतवून अजून उत्पादन वाढत असताना मशिन आणि सोबतच रोजगारही वाढू शकतो. **जास्त लोकसंख्येमुळे** रोजगार मिळू शकत नाही हा सुद्धा भ्रम आहे कारण लोकसंख्या जास्त असेल तर गरजाही जास्त असतात, उत्पादनाची गरजही जास्त असते, आणि त्यामुळेच रोजगाराची शक्यता सुद्धा! इथेही आडवी येते ती भांडवली व्यवस्था जी काहींना 12-14 तास काम करवते आणि इतरांना बेरोजगार ठेवते. लक्षात घेतले पाहिजे की स्पर्धेमध्ये हरल्यामुळे रोजगार न मिळालेले **युवक 'नालायक' नाहीत,** तर काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीकरिता रोजगार निर्माण न करणारी भांडवलशाही 'नालायक' आहे! **आरक्षण** हे उपलब्ध रोजगारामध्ये वाटण्या करते, रोजगार निर्माण करत नाही, तेव्हा आरक्षणामुळे बेरोजगारी आहे हा सुद्धा खोटारडा प्रचारच. बेरोजगारीचे मूळ कारण भांडवलाने निर्माण केलेली वाढत्या नफ्याच्या दराची हाव, स्पर्धा, बाजाराची अर्थव्यवस्थाच आहे.

भांडवली उत्पादन व्यवस्था एकीकडे रोजगार निर्मितीच कमी करते आणि दुसरीकडे बेरोजगारांच्या खड्या फौजेचा फायदा घेऊन मजुरांना त्यांच्या श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षाही कमी दामात काम करायला भाग पाडते, आणि चढ्या दराने नफा मिळवते. भांडवलदारांच्याच पक्षांची सरकारे त्यामुळेच रोजगार निर्मितीही हात आखडताच ठेवतात, जेणेकरून मजुरांच्या बाजारात बेरोजगारांचा पुरवठा वाढता रहावा. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या (खाउजा) भांडवलधार्जिण्या धोरणकाळात तर सरकारी नोकऱ्या घटवणे, खाजगीकरण वाढवणे हा सर्व सरकारांचा घोषित कार्यक्रमच आहे.

व्यवस्थेचे हे खरे रूप समजून आज कामगार वर्गासोबत मिळून युवकांनी बेरोजगारीच्या प्रश्नाविरोधात क्रांतिकारी लढा उभा केला पाहिजे! नोकरी न मिळाल्यामुळे स्वत:चा जीव घेणे हा मार्ग नाहीच! अस्मितावादी आंदोलनांमागे न जाता, भांडवली व्यवस्थेला आह्वान देत सर्वांना रोजगार देईल अशा राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याकरिता, रोजगाराच्या मूलभूत अधिकाराकरिता आंदोलन उभे करणे हाच एकमेव मार्ग आहे.

# शिक्षण अधिकारावर ऑनलाईन शिक्षणाचा हल्ला!

## सोयींअभावी कोट्यवधी शिक्षणापासून वंचित!

✎ पूजा

कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत राज्य आणि केंद्र सरकारच्या अनास्थेमुळे अनेकांना विविध स्तरांवर अडचणींना सामोरे जावे लागले. आरोग्यव्यवस्था पूर्णतः कोलमडून पडली. करोडो कामगार-कष्टकरी जनतेवर उपाशी मरण्याची पाळी आली. शिक्षण क्षेत्र देखील याला अपवाद नव्हते. अचानकच पूर्वी कधीही विद्यार्थी-शिक्षकांच्या सोयीचे नसलेले ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले. यातून देशात शिक्षण घेणाऱ्या 33 करोड विद्यार्थ्यांच्या शेकडो समस्या उद्भवल्या. एकीकडे कोट्यवधींना शिक्षणालाच मुकावे लागले, दुसरीकडे शिक्षणाचा दर्जा तर घसरलाच परंतु मानसिकरित्याही अनेक गंभीर परिणाम शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेत. यात प्रभावित होणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने कामगार-कष्टकरी, गरीब घरांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांचाच समावेश आहे. कोरोनाकाळात इतर सर्व गंभीर मुद्द्यांवर सरकारने स्वत:ची जबाबदारी झटकत ज्याप्रमाणे जनतेला 'आत्मनिर्भर' होण्यास सांगितले त्याचप्रमाणे देशातील विद्यार्थ्यांना देखील वाऱ्यावर सोडून स्वतः मात्र निवडणुकीचा प्रचार, लसीकरणाच्या मोहिमेत ठिकठिकाणी प्रधानमंत्र्यांची फोटोसहित जाहिरात इत्यादी 'अत्यंत महत्वाच्या' कामांत देशातील जनतेचा पैसा वाया घातला.

### अनियोजित पद्धतीने ऑनलाईन शिक्षण प्रणाली लागू केल्याचे परिणाम

देशभरात ऑनलाईन शिक्षण प्रणालीमुळे, निकालांपासून ते प्रवेशप्रक्रियेच्या अनिश्चिततेमुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर नैराश्य, चिंता, अनिश्चितता यांचे सावट पसरले आहे. असे असतांना सरकार ऑनलाईन शिक्षणपद्धतीला एक उत्तम पर्याय म्हणून सिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहे. नियमित शिक्षण प्रणालीत तो लागू करण्याच्या चर्चा देखील सुरू आहेत. ऑनलाईन शिक्षण हे आपदेच्या काळात एक तात्कालिक पर्याय म्हणून वापरात आणला होता त्याला नियमितपणे लागू करणे म्हणजे एकंदरीत विद्यार्थ्यांच्या भवितव्याला अंधाऱ्या दरीत ढकलणे आहे. देशभरात शाळा, महाविद्यालये बंद केल्या नंतर सरकारने अचानकच अनियोजित पद्धतीने ऑनलाईन वर्ग सुरू करण्याचे आदेश दिलेत ज्याचा सरळ अर्थ आहे: शहरी भागातील कामगार-कष्टकरी, गरीब पार्श्वभूमीतून येणारे विद्यार्थी व ग्रामीण भागातील प्रामुख्याने शेतमजुरी करणाऱ्या किंवा इतर कष्टाची कामे करून पोट भरणाऱ्या परिवारातील विद्यार्थ्यांना (मुळातच असमान असणाऱ्या) शिक्षण प्रणालीपासून वंचित ठेवणे, शिक्षणाचा मूलभूत अधिकार हिसकावून घेणे! 2017-18 च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार भारतात केवळ 23. 8% घरात इंटरनेट ची सुविधा आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी फक्त 14.9% विद्यार्थ्यांकडे इंटरनेटची सुविधा आहे. याचाच अर्थ बहुतांश विद्यार्थ्यांकडे इंटरनेट सुविधा नसतांना, त्याची काहीच तरतूद न करता, योजना न बनवता ऑनलाईन वर्ग सुरू करण्यात आलेत. एका अहवालानुसार ह्या काळात 27-60% विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्गांना बसता आले नाही. प्रामुख्याने याची कारणं म्हणजे लॅपटॉप किंवा मोबाईल नसणं, उपकरण असलं तरी इंटरनेट सुविधा नसणं व ती घ्यायला पैसे नसणं! अनेकांनी घरातील सामान विकून, कर्ज काढून मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून मोबाईल विकत घेतलेत पण अवाजवी दर असलेले सर्वच कंपन्यांचे इंटरनेट पॅक कसे परवडेल? परिणामतः हजारो विद्यार्थ्यांना ह्या काळात शिक्षण ( कायमचे ! ) सोडावे लागले. माळशेज येथील आदिवासी पाड्यांवरील सर्वच विद्यार्थ्यांना (वयोगट 6-20 वर्षे) शिक्षण सोडून देऊन कुटुंबाच्या पोषणासाठी मासेमारी करावी लागत असल्याचा रिपोर्ट द लॉजिकल इंडियन ह्या वृत्तवाहिनीने दिला आहे.

### मुली वाढत्या संख्येने शिक्षणापासून वंचित

टेलिग्राफच्या एका अहवालानुसार ह्या संपूर्ण काळात मुलींचे शिक्षण प्रणालीतून कायमसाठी बाहेर जाण्याचे प्रमाण अत्याधिक वाढले आहे. 20 टक्के मुलींना कायमसाठी शिक्षण सोडावे लागले तर 37% मुली ह्याबाबत साशंक आहेत की त्यांना पुन्हा शिक्षण सुरू करता येईल किंवा नाही. पितृसत्ताक समाज व्यवस्थेत मुळातच मुलींना शिक्षणाच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध असतात. लॉकडाऊनच्या काळात झालेल्या विद्यार्थ्यांच्या गळतीमध्ये सर्वाधिक प्रमाण हे मुलींचे आहे. संसाधनांची अनुपलब्धता हे मुख्य कारण आहेच, त्याशिवाय घरी असल्यास ऑनलाईन तासांपेक्षा प्राथमिकतेवर घरकाम करण्याचा ताण, आणि घरात एकच मोबाईल असेल तर तो मुलाला मिळतो आणि मुलींना वंचित ठेवले जाते. देशभरातील विद्यार्थिनींच्या एकूण संख्येपैकी केवळ 26% मुलींना इंटरनेट ची सुविधा उपलब्ध आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील 80% मुलींना कधीच इंटरनेट किंवा कुठल्याही संदेश वहन उपकरणाची सुविधा मिळाली नाही. देशात ही परिस्थिती असतांना मुलींच्या शिक्षण सोडण्याच्या वाढत्या प्रमाणास कारणीभूत पूर्णतः केंद्र आणि राज्य सरकारांची अनास्था आणि अव्यवस्थाच जबाबदार आहे. देशभरात सर्वाधिक प्रमाणात अल्पवयीन मुलींचे विवाह लॉकडाऊन च्या काळात झालेत. हीच भाजपा च्या 'बेटी बचाव बेटी पढाओ' च्या नाऱ्याची सत्यता आहे!

### अपंग विद्यार्थ्यांच्या समस्या

देशात अपंग विद्यार्थ्यांसाठी मुळातच अत्यल्प सुविधा उपलब्ध आहेत, सामाजिक स्तरावर देखील अनेक पातळींवर त्यांना भेदभावाला सामोरे जावे लागते. लॉकडाऊन च्या काळात 77% अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण घेणं **अत्यंत** कठीण गेले. त्यांच्या साठी साइन लॅंग्वेज (संकेत भाषा), विशेष प्रकारची पुस्तकं, विशेष शिक्षक, ध्वनीफिती, इत्यादी विशेष माध्यमांची सोय करणे अनिवार्य होते. 64% अपंग विद्यार्थ्यांकडे इंटरनेट ची किंवा मोबाईल, लॅपटॉप ची कोणतीही सुविधा उपलब्ध नाहीये. विशेष सवलती तर दूरच पण मूलभूत सुविधा देखील पुरवण्यात आल्या नाहीत!

अशाप्रकारे देशात एकीकडे महासत्ता होण्याच्या चर्चा चालतात आणि दुसरीकडे देशातील करोडो कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणप्रणालीच्या बाहेर फेकले जातात, ज्याची शासन दरबारी ना नोंद आहे ना दखल!

### अभ्यासाचे साहित्य, पुस्तकांची अनुपलब्धता

सर्वच कोर्सची पाठपुस्तके, संदर्भ ग्रंथ अत्यंत महाग असल्याने अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थिती नसल्याने पुस्तके विकत न घेता अभ्यासासाठी वर्गात शिकवल्या जाणाऱ्या तासांच्या नोट्स वर अवलंबून असतात किंवा ग्रंथालयातील पुस्तकांमधून अभ्यास करतात. लॉकडाऊनच्या काळात सर्व महाविद्यालये बंद असल्याने ग्रंथालयातून पुस्तके मिळाली नाहीत. विद्यापीठाकडून, महाविद्यालयांकडून कुठल्याही प्रकारच्या नोट्स देखील पुरवल्या गेल्या नाहीत. दोन तृतीयांश ग्रामीण विद्यार्थ्यांना अभ्यासाचे काहीच साहित्य उपलब्ध झाले नाही. अनेक ठिकाणी ऑनलाईन तासांचे रेकॉर्डिंग होत नसल्याने नेटवर्क चा अभाव असल्याने किंवा कुठलीही तांत्रिक अडचण असल्याने तासाला न बसता आल्यास पुन्हा तास ऐकण्याची काही सोय नव्हती. आंध्रप्रदेशातील 65% आणि राजस्थानातील 40% विद्यार्थ्यांकडे एकही पाठ्यपुस्तक उपलब्ध होऊ शकले नाही. ही पुस्तकं, अभ्यासाचं साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा शून्य मानस सरकारचा होता. भांडवली व्यवस्थेत शिक्षणाचं बाजारीकरण झालेलं असतांना भांडवलदारांच्या सेवेत मग्न केंद्र आणि राज्य सरकारला हे कसं शक्य झालं असतं? खरेतर ज्ञान हे कॉपीराईट मुक्त असलं पाहिजे! व्यापक प्रमाणात छापील पुस्तके आणि सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांना ई-लायब्ररी सुरू करून पुस्तकं उपलब्ध करून देणे सरकारची जबाबदारी आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे इंटरनेट नाही त्यांना पोस्टाने पुस्तकं, नोट्स पाठवण्याची सोय ऐन कोरोनाकाळात पोलिंग बूथ लावणाऱ्या सरकारला निश्चितच करता आली असती. ह्या परिस्थितीत विद्यार्थी अभ्यास कुठून आणि कसा करणार?

### अवास्तव शुल्क आणि प्रवेश प्रक्रिया, प्रवेश परीक्षा यांबाबत अनिश्चितता

कोरोनाकाळात 2 करोड पक्के रोजगार गेलेत. असंघटित क्षेत्रातील आणि प्रवासी कामगारांना तर आजही काम नाही. कामगार-कष्टकरी, गरीब कुटुंबात पगार नसतांना, कमाईचे कोणतेही साधन उपलब्ध नसतांना शाळा, महाविद्यालयाचे शुल्क भरणे विद्यार्थ्यांना शक्य नाही. तरी देखील अनेक ठिकाणी नेहमीपेक्षा अधिक शुल्क आकारण्यात आले. ग्रंथालय, कंप्युटर लॅब, प्रयोगशाळा, जिमखाना इत्यादींचे शुल्क देखील घेण्यात आले जेव्हा ह्या सुविधा विद्यार्थ्यांना मिळाल्या देखील नाहीत. खाजगी शाळांनी शुल्क न भरू शकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवले. 10 वी, 12 वी सी. बी. एस. सी च्या बोर्डाच्या परीक्षेचे शुल्क हे नेहमीपेक्षा जास्त घेण्यात आले, परीक्षा रद्द झाल्यानंतरही ते परत करण्यात आले नाही. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे गरीब, कष्टकरी कुटुंबातील मुलांना शिक्षण घेणे आधीच दुरापास्त होत आहे. आता तर फी न भरू शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण सोडण्यावाचून कुठलाही पर्याय शिल्लक नाही.

मार्च 2020 मध्ये सरकारने शाळा, महाविद्यालये बंद करण्यास सांगितल्या नंतर अचानकपणे अनियोजितरीत्या ऑनलाईन वर्ग सुरू केल्यानंतर एकूणच सर्व शाखांतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण व्हायला बराच उशिर झाला. सत्र उशिरा सुरू झाले आणि केवळ दीड दोन महिन्यांतच विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा द्याव्या लागल्या. ज्यासाठी विद्यार्थ्यांचा अभ्यासही झाला नव्हता आणि ऑनलाईन परीक्षांचा तांत्रिक अनुभवही विद्यार्थ्यांना नव्हता. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रवेश परीक्षा रद्द झाल्यात, प्रवेश कसा मिळणार ह्याबाबद्दल प्रचंड अनिश्चिततेचे वातावरण विद्यार्थ्यांमध्ये अजूनही पसरले आहे. 10, 12 वी नंतर पदवीचे क्षेत्र निवडले जाते आणि ह्या काळातच विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चितता आहे की त्यांच्या भवितव्यासोबत काय होणार? महाराष्ट्रात एम.पी.एस.सी.ची परीक्षा सलग पाचव्यांदा रद्द करण्यात आली. राज्य सेवा आयोगाच्या अत्यंत कमी जागांसाठी लाखो विद्यार्थी परीक्षा देतात. ह्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नेहमीच तणावाची स्थिती असते, त्यात 2018 ला शेवटची परीक्षा झाली होती. परीक्षेसाठी विद्यार्थी गाव-खेड्यांमधून येऊन पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर सारख्या शहरात येऊन दाखल झाले होते, परंतु परीक्षेला केवळ 2 दिवस शिल्लक असतांना परीक्षा रद्द झाल्याची समजल्यावर ह्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी रस्त्यांवर उतरले. पुण्यात तर विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज देखील केला गेला. आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना नक्कीच आहे. राज्यातील शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे सरकार सुद्धा भाजपच्या तुलनेत दमन करण्यात कुठेच कमी नाही हे दिसून येते आहे!

### काश्मिर मधील विद्यार्थ्यांवरील अन्याय

ऑगस्ट 2019 मध्ये मोदी सरकारने कलम 370 रद्द केल्यानंतर काश्मिर मधील इंटरनेट सुविधा, दळणवळणाची, संपर्काची सर्व साधने बंद करण्यात आली. उर्वरित भारतात लोकांनी जे कोरोनाकाळात लॉकडाऊन मध्ये सहन केलं त्यापेक्षा कितीतरी पटीने भयानक परिस्थितीत काश्मिरी जनता ऑगस्ट 2019 पासून राहतेय. तिथल्या विद्यार्थ्यांची शाळा, महाविद्यालये हे मागील 2 वर्षांपासून बंद आहेत. विद्यार्थी रोज वाट बघतात पुन्हा शाळा, महाविद्यालय

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित